गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
महावीर पेन्शन ठेव योजना
1 लाख रुपये गुंतवणुक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज*
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001




# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. ११.०१.२०२५ | अंक नं. २६४ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी.. विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी बाळाजी देडगांवकर
Since 1935
सराफ ॲण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर. फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# वॉकींगला गेलेल्या महिलेचे गंठण दुचाकीवर आलेल्या दोघांनी पळविले

## बुरूडगाव रोडवरील नक्षत्र लॉन शेजारी असलेल्या साईनगर परिसरातील घटना; पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर - बुरूडगाव रोडवरील नक्षत्र लॉन शेजारी असलेल्या साईनगर परिसरात वॉकींगला गेलेल्या महिलेला मोटारसायकल वर आलेल्या दोघांनी धक्का देवून त्यांच्या गळ्यातील साडेपाच तोळे वजनाचे सोन्याचे गंठण हिसका मारून तोडून नेल्याची घटना ७ जानेवारीला सायंकाळी ६.१० च्या सुमारास घडली. या प्रकरणी शुक्रवारी (१० जानेवारी) रात्री २ अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत जयश्री अमृतलाल कोठारी (वय ६३, रा.स्कायब्रीज सोसायटी, बुरूडगाव रोड) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांनी सन २०१३ साली राठोड ज्वेलर्स रविवार पेठ पुणे येथून गळ्यात परीधान करण्याकरीता साडे पाच तोळ्याचे सोन्याचे गंठण खरेदी केलेले असुन त्या ते नियमित वापरत होत्या. त्या नेहमी सायंकाळी त्यांच्या सोसायटीपासून साईनगर कोपऱ्या पर्यंत वॉकींगला जात असतात. ७ जानेवारीला नेहमीप्रमाणे त्या सायंकाळी ५.२५ ला घराबाहेर पडल्या. साईनगर कोपऱ्यापर्यंत गेल्यावर त्या पुन्हा माघारी परतल्या.

त्यांच्या सोसायटीकडे जात असतात त्यांच्या नणंद त्यांना भेटल्या. त्यांनी काही वेळ तेथे गप्पा मारल्या व नणंद निघून गेल्यावर फिर्यादी जयश्री या त्यांच्या सोसायटीच्या गेटकडे जात असताना पाठीमागून मोटारसायकलवर दोघे जण आले. काही अंतर पुढे गेल्यावर त्यांनी अचानक मोटारसायकल वळवून जयश्री यांच्या जवळ आणली. मोटारसायकल वर मागे बसलेल्या इसमाने त्यांना जोरात धक्का दिला आणि त्यांच्या गळ्यातील सोन्याचे गंठण हिसका मारून तोडले व दोघेही भरधाव वेगात मोटारसायकल वर निघून गेले.

चोरट्यांनी धक्का मारल्याने जयश्री या खाली रस्त्यावर पडल्या. त्यांच्या हाताला मार लागला. त्यानंतर त्यांनी त्यांच्या नणंद सुरेखा देसरडा यांना फोन करून बोलावून घेतले. देसरडा व इतरांनी जयश्री यांना उपचारासाठी दवाखान्यात नेले. त्यांच्या हाताला फ्रॅक्चर झाल्याने दवाखान्यात उपचार घेवून त्यांनी शुक्रवारी रात्री कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

या फिर्यादी वरून पोलिसांनी दोघा अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०९ (६) ३, २५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

### बुरूडगाव रोड परिसरात वाढला गुन्हेगारांचा वावर

शहरातील बुरूडगाव रोड परिसर गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात विकसित होत आहे. नवनवीन वसाहती या परिसरात उभ्या राहात आहेत. मोठी वर्दळ असलेल्या या परिसरात गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारांचा वावरही मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या परिसरात चेन स्नॅचिंगच्या घटना सातत्याने घडत आहेत. सकाळी, संध्याकाळी वॉकींगला जाणाऱ्या महिलांच्या गळ्यातील दागिने हिसकावून नेल्याच्या अनेक घटना या परिसरात घडल्या आहेत. या शिवाय चोऱ्या, घरफोड्या ही वाढल्या आहेत. त्यामुळे या परिसरात राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरलेले आहे. पोलिसांनी या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

दीप गार्ड पावर सिस्टम
सर्व कंपनीचे इन्व्हर्टर व बॅटरी रिपेअर करून मिळेल.
बॅटरी वॉटर टाकून मिळेल.
घरपोहोच सेवा
जुने इन्व्हर्टर बॅटरी विकत घेतो व विकतो
9260000613

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

विश्व का सबसे बडा अध्यात्मिक समागम महाकुंभ चले हम.
श्री भैरवनाथ यात्रा कंपनी आयोजित
मु. पो. चिंभळे, ता. श्रीगोंदा, जि. अ.नगर.
स्पेशल नेपाळसह प्रयागराज कुंभमेळा. जगन्नाथ पुरी. गंगा सागर एकधाम यात्रा.
प्रस्थान दि. १०/२/२०२५ प्रवास १८ दिवसांचा राहील
यात्रेतील प्रसिध्द ठिकाणे. उज्जैन.काशी. आयोध्या.गोरखपूर. नेपाळ पशुपतीनाथ.जनकपुर. गया. कोलकाता कालिकामाता मंदिर. हावडा ब्रीज. गंगासागर. ओडिसा भुवनेश्वर मंदिर. कोणार्क सुर्य मंदिर. जगन्नाथ पुरी धाम. व इतर बरेच काही.
प्रवास स्लीपर कोच लक्झरी बस ने केला जाईल. चहा.नाश्ता. दोन वेळ जेवण व शेरींग रूम मधे मुक्काम वेवस्था केली जाईल.
बुकिंग चालु आहे फक्त 25जागा शिल्लक. एकुण खर्च 28000 हजार. ॲडव्हानस 5000
अधिक माहितीसाठी संपर्क सुरजित शिरोळे मो. 7757810981 / 9284658430
- बस निघण्याचे ठिकाण - हॉटेल इंद्रायणी, छ. संभाजी नगर रोड, अहिल्यानगर. सकाळी अकरा वाजता

# नगर-दौंड रोडवर अपघात; दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू


पोपट जाधव (मयत)

नगर - भरधाव वेगातील अज्ञात वाहनाने दुचाकीला समोरून जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना नगर दौंड रोडवर विसापूर फाटा परिसरात १० जानेवारीला रात्री १०.३० च्या सुमारास घडली. पोपट धोंडीबा जाधव (वय ५३, रा. अकोळनेर, ता.नगर) असे मयताचे नाव आहे.

मयत पोपट जाधव हे दुचाकीवर सातारा येथे असलेल्या त्यांच्या विवाहित मुलीला भेटण्यासाठी गेले होते. शुक्रवारी रात्री ते दौंड रोडने नगरकडे येत असताना कोळगाव शिवारात विसापूर फाट्याजवळ एका अज्ञात वाहनाने त्यांना हूल दिल्याने त्यांची दुचाकी घसरली. त्याच वेळी नगरहून दौंड च्या दिशेने भरधाव वेगात चाललेल्या अज्ञात वाहने त्यांना धडक दिली. त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर अज्ञात वाहनचालक वाहनासह पसार झाला.

परिसरातील नागरिकांना अपघात झाल्याचे समजताच त्यांनी बेलवंडी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेहाची पाहणी केली असता खिशात आधार कार्ड सापडल्याने त्यावरील पात्यावरून पोलिसांनी अकोळनेर येथे नातेवाईकांशी संपर्क साधल्यावर मृतदेहाची ओळख पटली. श्रीगोंदा येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन केल्यानंतर शनिवारी (दि.११) दुपारी मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. मृत पोपट जाधव यांच्यावर अकोळनेर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

मयत पोपट जाधव हे प्रगतशील शेतकरी होते. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सून, जावई, नातवंडे, ३ भाऊ असा परिवार आहे.

# नगर एमआयडीसी परिसरात तरुणाचा दगडाने ठेचून खून

## बोल्हेगाव फाट्याजवळ मोकळ्या जागेत आढळला मृतदेह; पोलिसांकडून तपास सुरु


नगर मनमाड रोड वरील बोल्हेगाव फाट्याजवळ असलेल्या मोकळ्या जागेत तरुणाचा खुन केल्याचे समोर आल्यावर घटनास्थळी भेट देत पाहणी करताना जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला, एमआयडीसीचे स.पो.नि. माणिक चौधरी व पोलिस पथक.

नगर - नगरच्या एमआयडीसीमध्ये एका कंपनीत काम करणाऱ्या तरुणाचा अज्ञात व्यक्तींनी दगडाने ठेचून निर्घुण खुन केल्याची घटना शनिवारी (११ जानेवारी) सकाळी उघडकीस आली आहे. अश्विन मारुती कांबळे (वय ३२, रा. गणेश नगर, एमआयडीसी, मूळ रा. निपाणी, बेळगाव, कर्नाटक) असे या खुन झालेल्या तरुणाचे नाव आहे.

नगर-मनमाड रोड वरील बोल्हेगाव फाट्याजवळ असलेल्या ट्रॅक्टर शोरुम शेजारी पुलाच्या खालच्या बाजूस मोकळ्या जागेत एका तरुणाचा मृतदेह शनिवारी सकाळी आढळून आला. ही माहिती मिळताच एमआयडीसीचे स.पो.नि. माणिक चौधरी हे पोलिस पथकासह घटनास्थळी गेले. घटनास्थळाची पाहणी करून माहिती घेतली. त्यानंतर मृतदेहाची ओळख पटविण्यासाठी तपास सुरु केल्यावर सदर मृतदेह हा अश्विन मारुती कांबळे याचा असल्याचे निष्पन्न झाले. तो एमआयडीसी मधील एका कंपनीत काम करत होता. त्याचे पत्नीशी वाद झाल्याने तो मित्राच्या रूम वर राहात होता. शुक्रवारी सायंकाळी ७ वाजता तो मित्राशी बोलून घराबाहेर पडला होता. त्यानंतर रात्रभर त्याचा काहीही ठावठिकाणा लागलेला नव्हता. सकाळी त्याचा मृतदेह आढळून आला.त्याचा अज्ञात व्यक्तीने दगडाने ठेचून खुन केल्याचे प्रथमदर्शनी समोर आले आहे.

या घटनेची माहिती मिळाल्यावर पोलिस अधिक्षक राकेश ओला, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक, फॉरेन्सिक लॅबचे तज्ञ आदींनी घटनास्थळी भेट देवून पाहणी केली. पोलिसांनी शव विच्छेदनाकरिता मृतदेह जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठवला. दुपारी उशिरा या प्रकरणी अज्ञात इसमाविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या खुनाचा तपास पोलिसांनी सुरु केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली जात आहे. मयताचे कोणाबरोबर वाद होते का याचाही तपास केला जात आहे.



जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## ढील दे दे रे भैय्या... उस पतंग को ढील दे

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

नववर्षाचा हर्षोल्हास संपला की युवावर्गाला व पतंग शौकिनांना वेध लागतात पतंग उडवण्याचे! खरंतर हा एक विलक्षण व वैशिष्ट्यपूर्ण छंद आहे. विशाल आकाशात आपल्या पतंगास उंच, डौलदार उडवतांना कळत नकळत दृष्टीही भव्य, व्यापक बनते. आपली पतंग उंचच उंच नेऊन (बिलींग) इतरांच्या पतंगांना कापतांनाच मिळणारा आनंद केवळ अवर्णनीय!

पतंगोत्सवाची तयारी करतांना कुटुंबीय, मित्रमंडळींची धांदल उडलेली असते. मांजा चांगला सुतवणे, आणणे (पूर्वी लहान असतांना काच कुटुन मांजा सुतवण्याची भारी मजा असायची) आता पैसे असल्याने मांजा, डझनभर पतंगी सहजच घेतली जातात. गुजरात व सर्वत्र तर यांच्या व्यवहारांची रक्कम कोट्यावधीत जाते म्हणे!

अर्थात हा आनंद घेतांना निश्चितच काळजी घ्यायला हवी. पक्ष्यांना, इतरांच्या शरीरांना इजा होणे अयोग्यच. लहान मुलं कटलेली पतंग पकडायच्या नादात बेभान बनतात अन् कधी कधी अपघात करून घेतात. पण यातूनही जीवनाविषयी तत्त्वज्ञानाविषयी सबक मिळू शकते. आपलकडे बरंच काही असलं तरी छोट्या, शुल्लक गोष्टींच्या मागे किती



पळतो ना आपण? तसेच नमकहराम मधल्या रजा मुरादने म्हटल्याप्रमाणे पतंग उडाते वक्त ऐसा लगता है जैसे उपरवाले की डोर निचेवालेके हाथमें है...

थांबतो नाही तर म्हणाल, 'आखड आता, फार ढिल दिली.'' पतंगोत्सवाच्या शुभेच्छा...!

# 'नायलॉन मांजा'च्या दुष्परिणामांबाबत महापालिकेची विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

### फिरोदिया हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी घेतली शपथ; नायलॉन मांजाची केली होळी



नायलॉन मांजाच्या दुष्परिणामांबाबत महानगरपालिकेतर्फे विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली.

नगर - महानगरपालिका व इको क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छ सर्वेक्षण २०२४ व माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल येथे नायलॉन मांजाची होळी करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये नायलॉन मांजाच्या वापरामुळे होणारे दुष्परिणाम, मानवी जीवन व पक्ष्यांना होणारी इजा याबाबत जनजागृती करण्यात आली. नायलॉन मांजाचा वापर न करण्याबाबत सामुहिक शपथ घेण्यात आली. माझी वसुंधरा अभियानात सहभागी होण्याची सामूहिक शपथही घेण्यात आली.

मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर नायलॉन मांजाचा वापर पतंगप्रेमी करत आहेत. या मांजाच्या विक्री व वापरावर राष्ट्रीय हरीत लवादाने बंदी घातली आहे. याबाबत कारवाईची तरतूदही करण्यात आली आहे. आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या आदेशानुसार महापालिकेने विविध पथके स्थापन करून तपासणी सुरू केली आहे. मात्र, नायलॉन मांजाचा वापर टाळण्यासाठी जनजागृती आवश्यक आहे. त्यामुळे महानगरपालिका, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व इको क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करून नायलॉन मांजाची होळी करण्यात आली.

दरम्यान, आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या पुढाकारातून सुरू करण्यात आलेल्या दर शनिवारी स्वच्छता अभियानात रासनेनगर चौक ते डौले हॉस्पिटल बिल्डींग ते म्हाडा बिल्डींग परिसरात स्वच्छता मोहीम पार पडली. यामध्ये जेसीबी, ट्रॅक्टर, जेटींग मशीनच्या साह्याने स्वच्छता करण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत नागरिकांनी सहभाग नोंदवला.

# तोफखाना परिसरात नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यास पकडले

### ३० हजार रुपयाचा मांजा पकडला, गुन्हा दाखल

नगर - नायलॉन मांजा विक्री व वापरास बंदी असतानाही पशु पक्षी व मानवी जीवितास धोकादायक असणारा नायलॉन मांजा विक्रीसाठी स्वत:च्या कब्जात बाळगणाऱ्या एकावर तोफखाना पोलिसांनी कारवाई करुन ३० हजार रुपये किमतीचा नायलॉन मांजा जप्त केला. ही कारवाई तोफखाना परिसरातील नवरंग व्यायाम शाळेजवळ शुक्रवारी (१० जानेवारी) सायंकाळी करण्यात आली.

तोफखाना पोलीसाना अशी माहिती मिळाली की, ओंकार सुरेश कांबळे (रा. नवरंग व्यायाम शाळेजवळ, तोफखाना) हा त्यांच्या राहत्या घराच्या आडोशाला नायलॉन मांजाची विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःच्या कब्जात मांजा बाळगुन आहे. अशी माहिती मिळाल्याने तोफखाना पोलीसांनी तात्काळ तेथे जाऊन अचानक छापा टाकत ओंकार कांबळे यास पकडले. त्याच्या घरात एका गोणीत ३० हजार रुपये किमतीच्या नायलॉन मांज्याच्या ६० रीळ जप्त केल्या.

या प्रकरणी पो.कॉ. राहुल म्हस्के यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलिसांनी ओंकार कांबळे याचे विरुध्द बी एन एस २०२३ चे कलम १२५, २२३ सह पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ५,१५ सह म.पो.का १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

ही कारवाई पोलिस उपनिरीक्षक शैलेश पाटील, पोलीस अंमलदार शिरिष तरटे, दत्तात्रय कोतकर, सतिष त्रिभुवन, सतिष भवर, राहुल म्हस्के, महीला पोलिस अंमलदार गाडेकर यांनी केली.

# शिर्डी येथे एरोस्केटोबॉल राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन

### महाराष्ट्र संघात नगरच्या पाच खेळाडूंची निवड

नगर - ११ व १२ जानेवारी रोजी शिर्डी येथे एरोस्केटोबॉल राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून ११ वर्ष, १७ वर्ष व वरिष्ठ गट मुले व मुली यांची स्पर्धा होणार असून सदर स्पर्धांसाठी सुमारे पाच हजार खेळाडू विविध राज्यातून येणार आहे.

महाराष्ट्र, तामिळनाडू, अंद्रा प्रदेश, कर्नाटक, मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात, दिल्ली, केरळ, अश्या विविध राज्यातून स्पर्धक आपले कौशल्य पणाला लावणार आहे. महाराष्ट्र संघात अहिल्यानगर येथील जिल्हा संघटनेचे पाच खेळाडू कु. वैभव पाटोळे, आदर्श बिस्वास, सोहम शिंदे, कार्तिक नन्नवरे, मोहित बका यांची निवड झाली आहे. सदर निवडीबद्दल त्यांना संघटना कर्याधक्ष संजय नन्नवरे, अधक्ष्य प्रदीप पाटोळे, सचिव प्रशांत पाटोळे तसेच एन एस पी फाउंडेशनच्या नलिनी सुंदर पाटोळे यांनी शुभेच्छा दिल्या.

# शिक्षण उपसंचालक कार्यालयातील भ्रष्ट अधिकाऱ्यांनी विरोधात आंदोलन

नगर - कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनेक प्रश्न प्रलंबित असल्याचे एकमेव कारण म्हणजे पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयातील वर्षानुवर्षी दबा धरून बसलेले भ्रष्ट अधिकारी, लिपिक यांचे तात्काळ बदली करून प्रलंबित प्रश्न मार्गी लागत नाही, वर्षानुवर्षी फाईल कार्यालयात पडून राहतात, शासनमान्य संघटनेच्या निवेदनांना व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशांना केराची टोपली दाखवली जाते, त्यामुळे त्यांच्यावर दप्तर दिरंगाई अंतर्गत कारवाई करून बदली होत नाही त्यासाठी शिक्षक भारती संघटना शिक्षण आयुक्त कार्यालय पुणे येथे असंतोष आंदोलन करणार आहे, असा इशारा शिक्षक भारती संघटनेचे सरचिटणीस महेश पाडेकर यांनी दिला.




शिक्षक भारती संघटना शिक्षण आयुक्त कार्यालय पुणे येथे असंतोष आंदोलन करणार आहे.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे शालार्थ आय.डी., वैयक्तिक, अर्धवेळ मान्यता, सी.एच.बी. मान्यता, संच मान्यता करताना प्राचार्य, कर्मचाऱ्यांना वेठीस धरणे, वेतन निश्चिती मेडिकल व थकीत देयके, घडाळी तत्वावरील काम करणारे शिक्षकांचे मानधन तीन वर्षापासून अदान न करणे, राष्ट्रीय सेवा योजनेचा निधी न देणे शालाबाह्य कामे देणे, एन.पी.एस., डी.सी.पी.एस. पेन्शन चा हिशोब पावत्या न देणे, वरिष्ठ व निवड श्रेणी प्रस्ताव मंजूर न करणे, एकस्तर वेतन श्रेणीसाठी कर्मचाऱ्यांना वेठीस धरणे अशा विविध प्रश्न प्रलंबित असून शिक्षण उपसंचालक कार्यालयातील कर्मचारी जबाबदार आहे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शारीरिक व मानसिक त्रास देऊन आर्थिक देवाण-घेवाण केल्याशिवाय कुठलेही काम होत नाही प्रचंड मोठ्या प्रमाणात एजंटचा वावर शिक्षण उपसंचालक कार्यालयात पुणे येथे असल्याने संघटनेने या आधी दोन वेळेस निवेदन देऊनही संबंधित कर्मचारी त्याच कार्यालयात कार्यरत असल्याने शिक्षक भारती संघटना अहमदनगर यांचे शिक्षण आयुक्त पुणे कार्यालय पुणे येथे धरणे आंदोलन करणार आहे, अशी माहिती महेश पाडेकर यांनी दिली. तसेच प्रभारी शिक्षण उपसंचालक हरुण अत्तार यांच्याकडे देखील तोंडी माहिती दिली असून त्यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही न झाल्यामुळे महिनाअखेरीस आंदोलन छेडणार आहे.

या आंदोलनास राज्य सचिव सुनील गाडगे, जिल्हाध्यक्ष रामराव काळे, महेश पाडेकर, महिला जिल्हाध्यक्षा रूपाली कुरुमकर, जिल्हा उपाध्यक्ष सचिन जासूद, दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, प्रसिद्धीप्रमुख अमोल चंदनशिवे, तालुका अध्यक्ष संजय सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, संजय भालेराव, नानासाहेब खराडे, रूपालीताई बोरुडे, मफीज इनामदार, कल्पना चौधरी, अकील फकीर आदी पदाधिकाऱ्यांनी पाठिंबा दिला आहे.

# अहमदनगर महाविद्यालय बी.बी.ए. विभागातर्फे १६ जानेवारी रोजी 'नेक्सजेन २०२५' प्रदर्शन



नगर - अहमदनगर विद्यालय बी.बी.ए. विभागाच्या विद्यार्थ्यांतर्फे नेक्सजेन २०२५ प्रदर्शनाचे आयोजन १६ जानेवारी रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात नगरकरांना खरेदी व विक्रीचा अनुभव घेता येणार आहे. हे प्रदर्शन अहमदनगर महाविद्यालय येथील प्लेग्राउंड वर होणार असून या प्रदर्शनात विविध प्रकारचे ५५ स्टॉल आहेत. त्यामध्ये कपडे, मोबाईल, ॲक्सेसरीज, ज्वेलरी, विविध एज्युकेशन इन्स्टिटयूट, ऑटोमोबाईल आणि फूड स्टॉल आहेत. या प्रदर्शनात नगरकरांनी उपस्थित राहून खरेदीचा आनंद घ्यावा असे आवाहन विद्यार्थ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या प्रदर्शनाचे उद्‌टन प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. विभागप्रमुख डॉ. तुषिता अय्यर व सर्व प्राध्यापक वृंद विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत.

# नगर शहरात रंगणार २ दिवसीय कराटेचा महामुकाबला; 'रिपब्लिक कप' साठी भिडणार १५ राज्यांतील ८३० खेळाडू



नगर - इंडियन ओपन रिपब्लिक कप कराटे स्पर्धेचा १८ ते १९ जानेवारी रोजी अहिल्यानगर येथील वाडियापार्क क्रीडा संकुल येथे कराटे स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत १५ राज्यांतील खेळाडू ऐकून ८३० खेळाडू आपले कौशल्य दाखवण्यासाठी सहभागी होणार आहेत. स्पर्धेचे थेट प्रक्षेपण स्पोर्ट्स ओके ओटीटी प्लॅटफॉर्मवर केले जाणार आहे, ज्यामुळे देशभरातील प्रेक्षकांना दोन दिवशी कराटेचा थरार पाहता येईल. या स्पर्धेचे आयोजन युथ कराटे फेडरेशन व स्पोर्ट्स ओके यांच्या विद्यमाने करण्यात आले आहे. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आणि कराटे खेळाला राष्ट्रीय पातळीवर अधिक प्रसिद्धी मिळवून देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती आयोजक साहिल सय्यद व सबिल सय्यद यांनी दिली.

या स्पर्धेच्या विजेत्यांसाठी रोख रक्कम बक्षीस व आकर्षक ट्रॉफी ठेवण्यात आली आहे. मागील वर्षी झालेल्या पहिल्या वर्षी मध्ये महाराष्ट्र संघाने विजेतेपद पटकावले होते. तर कर्नाटक व गुजरात यांनी अनुक्रमे दुसरे व तिसरे स्थान मिळवले होते. यावर्षी ही खासदार निलेश लंके यांनी स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या असून. खेळाडूंसाठी ही एक मोठी संधी ठरणार आहे. यंदा कोणता संघ विजयी होईल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

युथ कराटे फेडरेशन आणि स्पोर्ट्स ओके यांची ही स्पर्धा कराटे खेळाला नवी दिशा देईल व नवोदित खेळाडूंना प्रेरणा देईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे. तसेच अहिल्यानगर रुरल अँड अर्बन कराटे असोसिएशन च्या वतीने सदर स्पर्धेसाठी मोठे सहकार्य लाभणार आहे. माहितीसाठी मो. ९३०७९९५४००.

### अंबिका महिला बँकेच्या संचालिका

# श्रीमती पुष्पाताई मरकड यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - अंबिका महिला बँकेच्या संस्थापक संचालिका व विद्यमान संचालिका सेवानिवृत्त प्राध्यापिका श्रीमती पुष्पाताई मोहनराव मरकड (वय ७६) यांचे सकाळी सात वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर अमरधाम अहिल्यानगर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. मराठा पतसंस्थेचे उपाध्यक्ष व महाराष्ट्र साहित्य परिषदेचे शाखाध्यक्ष पत्रकार किशोर मरकड व नितीन मरकड यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या मागे दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

अंबिका महिला बँकेच्या स्थापनेपासून ३७ वर्ष ते सातत्याने संचालिका म्हणून कार्यरत होत्या. अनेक वर्षे अध्यक्ष, उपाध्यक्ष अशी विविध पदे त्यांनी भूषवली आहेत. त्यांच्या कार्यकाळात बँकेला अनेक राष्ट्रीय व राज्यस्तरीवरील अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांचे पती ज्येष्ठ शिक्षक नेते स्वर्गीय एम.एस. मरकड सर व पुष्पाताई या दोन्ही आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेल्या पहिले पती-पत्नी आहेत त्यांनी विविध शैक्षणिक व सामाजिक संस्थेवर काम केले असून त्यांना मराठा सेवा संघ व मराठा पतसंस्थेच्या वतीने दिला जाणारा मराठा समाज भूषण पुरस्कार, आदर्श माता पुरस्कार, आदर्श संचालिका पुरस्कार मिळालेला आहे.

# नगरच्या 'मनचाही आवाजें' ओपन माईक व्यासपीठाने मुंबई गाजवली

### कार्यक्रमाला नवोदित कलाकारांचा प्रतिसाद

नगर - नवोदित तसेच अनुभवी कलाकारांना त्यांची कला सादर करण्यासाठी नगरमध्ये स्थापन झालेल्या 'मनचाही आवाजें' या पहिल्या ओपन माईक व्यासपीठाने मुंबईत इव्हेंट आयोजित करून वाहवा मिळवली आहे. टाटा ग्रुपच्या स्टारबक्स या आंतरराष्ट्रीय ब्रॅण्डच्या सहयोगाने मुंबईतील पवई हिरानंदाणी येथे हा कार्यक्रम घेण्यात आला. यात कुणाल व गोविंद, अंतरा राजभट्ट व मिताली साचेती या तिघांनी विजेतेपद मिळवले. ज्युनियर अमिताभ बच्चन अशी ओळख असलेल्या राजकुमार भक्तियानी या कार्यक्रमाला उपस्थित राहून मनचाही आवाजेंच्या टिमचे कौतुक केले.



नगरच्या 'मनचाही आवाजें' ओपन माईक व्यासपीठाचे कलाकार.

नव्या युगात अंगभूत कला सादर करण्यासाठी सोशल मिडियासारखे व्यासपीठ असले तरी प्रत्यक्ष प्रेक्षकांसमोर लाईव्ह कला सादर करून थेट प्रतिसाद मिळवणे कलाकारांना अधिक भावते. नवोदितांना असे व्यासपीठ सहज उपलब्ध होत नाही. हीच बाब ओळखून नगरमधील भव्य सचदेव, कार्तिक पोपटानी, रौनक नागपाल या युवकांनी मनचाही आवाजें ओपन माईक हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. नगरमध्ये वेळोवेळी आयोजित इव्हेंटमध्ये अनेक गुणी कलाकारांनी सादरीकरण केले. स्टॅण्ड अप कॉमेडी, गायन, वादन, मिमिक्री असे विविध कलाप्रकार यात सादर करता येतात. प्रेक्षकांचा जागेवर प्रतिसाद मिळत असल्याने कलाकारांना प्रोत्साहन मिळते.

मनचाही आवाजेंने उत्कृष्ट व्यवस्थापन कौशल्य दाखवल्याने त्यांना थेट स्टारबक्स सारख्या ब्रॅण्डने इव्हेंटसाठी सहकार्य केले. लूक्स सैलून, आईडिजाइनइट आरएन फोटोग्राफीच्या सहकार्याने मुंबईतील हा इव्हेंट नवोदित युवा कलाकारांसाठी पर्वणी ठरला. जैनिश गोटेचा व लखन गुरदासानी यांनी या कार्यक्रमात परीक्षक म्हणून योगदान दिले. मनचाही आवाजेंच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी संपर्क ८९५६६९६८९७/९९६०४७६७८८.

# नरेंद्र पुप्पाल यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - पुप्पाल इस्टेट एजन्सीचे संचालक नरेंद्र दत्तात्रय पुप्पाल (वय ७४) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी रेखा, विपुल व करण ही दोन मुले व सून प्राजक्ता असा परिवार आहे. ॲड. अभिजीत पुप्पाल यांचे ते चुलते होते.

# भारतीय जनता पार्टी हा जगातील सर्वात मोठा पक्ष

### वसंत लोढा यांचे प्रतिपादन; प्रभाग क्रमांक १३ मध्ये सभासद नोंदणीला प्रतिसाद

नगर - भारतात एकाच वेळी भारतीय जनता पार्टीचे सदस्यता नोंदणी अभियान सुरू झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत देशात मोठ्या प्रमाणात सदस्यता नोंदणी अभियान सुरू आहे. त्यामुळे भारतीय जनता पार्टी हा जगातील सर्वात मोठा पक्ष आहे, असे प्रतिपादन प्रदेश कार्यकारणी सदस्य वसंत लोढा यांनी केले आहे.

प्रभाग क्रमांक १३ मध्ये चौपाटी कारंजा येथून सदस्यता नोंदणी अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. यानंतर सांगळे गल्ली, चितळे रोड, पटवर्धन चौक, नालेगाव, गौरी घुमट, रंगारगल्ली, शनि चौक, गांधी मैदान असे अभियान राबविण्यात आले.

याप्रसंगी वसंत लोढा, ओबीसी मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, सरचिटणीस, सचिन पारखी, प्रशांत मुथा, युवक अध्यक्ष मयुर बोचुघोळ, अनिल सबलोक, नरेंद्र कुलकर्णी, महावीर कांकरिया, राहुल जामगावकर, वीरेश क्षीरसागर, दंडनाईक, बाळासाहेब खताडे, ज्ञानदेव भांगे, गणेश कानगावकर, अजित कोतकर, कालिंदी केसकर, सौ.उज्वला भांगे, सौ.सोनाली पाठक आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.



भारतीय जनता पार्टीच्या सभासद नोंदणीला प्रभाग क्रमांक १३ मध्ये प्रतिसाद मिळत आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### हिवाळ्यात घ्या बोर खाण्याचे लाभ

बोर हे हिवाळ्यात मिळणारे लहान फळ आहे. पण त्यात अनेक पोषक घटक आढळतात. बोरमध्ये व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात असते जे रोगप्रतिकारशक्ती मजबूत करण्यास मदत करते. हे सर्दी, खोकला यांसारख्या आजारांपासून संरक्षण करते.

## पाककला

### खवापुरी

**साहित्य :** दीड वाटी मैदा, पाऊण वाटी रवा, दीड वाटी खवा, दीड वाटी पिठीसाखर, दोन चमचे वेलची पूड, तूप.

**कृती :** रवा व मैदा एकत्र करून, दोन चमचे तुपाचे मोहन घालून, घट्ट भिजवून, तासभर झाकून ठेवावा. रवा-मैदा कुटून घ्यावा. खवा परतून घेऊन, त्यात पिठीसाखर व वेलची-पूड घालून, चांगले मळावे. रवा-मैद्याच्या पिठाच्या लाट्या करून पातळ पुऱ्या लाटाव्या. एका वेळी दोन पुऱ्या लाटाव्या. एका पुरीवर खवा- साखरेचे सारण पसरून, त्यावर दुसरी पुरी ठेवून, कडा दाबून घ्याव्या. सर्व पुऱ्या झाल्यावर त्या तुपातून तळून काढाव्या. या पुऱ्या गरम असताना चांगल्या लागतात. शिवाय त्या शेवयांच्या खिरीबरोबर किंवा बासुंदीबरोबर खाण्यासही चांगल्या लागतात.

## सल्ला

### किचन संबंधी टिप्स्

शिजविलेला बटाटा पाट्यावर वाटल्यास गोळा चिकट होतो. गोळा चिकट व्हावयास नको असल्यास बटाटा उकडून झाल्यावर गरम असतानाच, बटाटा मॅश करावयाचे यंत्र मिळते, त्यातून दाबून काढल्यास अगर शेंगदाण्याची पूड करावयाच्या यंत्रातून काढल्यास शेवेसारखा भुगा पडतो.

## वास्तू

वायव्य भागात बँकेच्या विविध बचत अथवा कर्ज योजनांची पोस्टर्स जनतेला आकर्षित करण्यासाठी आकर्षकरित्या लावावी.

## सौंदर्य

आय-लायनर लावून झाल्यानंतर डोळ्यात काजळ घालावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. १२ जानेवारी २०२५

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष शुक्लपक्ष, मृग ११।२५, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०५ वा. ३६ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल.

**वृषभ :** गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश आणि आनंद मिळेल. जुने मित्र भेटतील.

**मिथुन :** योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल. मागील उधारी वसुल होईल.

**कर्क :** काम व इच्छित योजनेला अमलात आणण्याचे प्रयत्न कराल.

**सिंह :** आपण जे करण्याची इच्छा ठेवता ते सुरुवातीपासून ठरवून घेतल्याने नियोजन चांगले होईल.

**कन्या :** व्यापार-व्यवसाय चांगला राहील. प्रिय व्यक्तीबरोबर संवाद होईल. राहिलेल्या ईच्छा पूर्ण होतील.

**तूळ :** कुटुंबियांबरोबर वेळ व्यतीत कराल.

**वृश्चिक :** आपल्या आवडीच्या नातलगांना भेटाल. सुख-शांतीचे वातावरण राहील.

**धनु :** आपण आपल्या घराच्या वाढीबाबत काही योजना बनवू शकता.

**मकर :** बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील. महत्त्वाच्या कामांसाठी श्रम करावे लागेल.

**कुंभ :** आज आपल्या आयुष्यात आपल्या नातलागांची व मित्रांची चांगली भूमिका रहाणे शक्य आहे.

**मीन :** आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळल्याने अपयश येईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

## भाववाढ

गिऱ्हाईक :- चित्राची किंमत किती ? चित्रकार:- एक हजार रुपये

ग्राहक :- काय एक हजार ! अहो गेल्या आठवड्यांत याच चित्राची किंमत तुम्ही पाचशे रुपये सांगितली होती.

चित्रकार :- होय. पण त्या दिवसांनतर मोबदला व लागणारे साहित्य याचे भाव चांगलेच वाढलेत !

# जागतिक आश्चर्ये


## आयफेल टॉवर (पॅरिस)

आयफेल टॉवरचे उल्लेखनिय वैशिष्ट्य असे आहे की, हा टॉवर चक्क ३२० मीटर उंच आहे. बऱ्याच वर्षांपर्यंत हा टॉवर म्हणजे जगातील सर्वात मोठी अशी वास्तू मानली जात होती. पण अमेरिकेत न्यूयॉर्क मध्ये क्रिसरल बिल्डींग उभी राहिल्यानंतर आयफेल टॉवर दोन नंबरवर खाली आला.

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७०९१

सौ.शैलजा कुलकर्णी



### शब्दगंध क्र. ७०९० चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जा | ज | म | ■ | म | हा | न | ता |
| व | ■ | न | व | नी | त | ■ | व |
| क | या | स | ■ | षा | ■ | ग | दा |
| ■ | र | ब | र | ■ | च | ■ | न |
| म | ■ | दा | म | दु | ष्प | ट | ■ |
| ल | ह | र | ■ | का | ल | व | ड |
| म | ■ | ■ | भा | न | ■ | का | ग |
| ल | ग | ब | ग | ■ | बी | ■ | र |

**आडवे शब्द :-** १) थोर; मोठा; महा ४) एक मांसाहारी खाद्यपदार्थ ६) एक मराठी संत ८) निवडणुकीतील मुख्य प्रक्रिया ११) संकटसमयी येण्याविषयी केलेली प्रार्थना १२) नूतन; नवीन १३) भाव; हर; प्रत्येक; किंमत १४) एक सुगंधी वनस्पती १६) जीव गेलेला; मेलेला १७) अविरत; निरंतर; नित्य १९) डोंगर वगैरेतील खोलगट व लांबट जागा २०) ऐषोराम; शृंगार; क्रीडा २१) जिचा पती वारला आहे अशी स्त्री २२) गोणपाटाचा तुकडा; तातूक

**उभे शब्द :-** १) चिंतन; ध्यान २) माला; माळ; पराजय; पराभव ३) कालवा; पाट ४) पडदा ; कापडी भिंत ५) सामान वगैरे ज्यात बांधतात ते कापड किंवा गोणपाट ७) आठवड्यातील एक दिवस ९) लोणी १०) चलाख; हुशार; ताजातवाना ११) एक प्रकारचा साप १३) अति काम व त्यामुळे येणारा मानसिक व शारीरिक थकवा १५) निकाल; फडशा; उत्पन्नाचा हिशोब १८) एक प्रकारचे हलके रेशमी वस्त्र

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** यशाच्या शिखरावर पोहोचण्यासाठी कोणत्याच मर्यादा नसतात फक्त तुमचे विचार सकारात्मक असावयास हवेत.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## जगातला सर्वात लहान देश कोणता?

देश म्हणजे ठरवलेल्या आणि आंतरराष्ट्रीय मान्यता असलेल्या सीमारेषांकित सार्वभौमसत्तेच्या आधिपत्याखालील भूप्रदेश. या देशाचे स्वतःचे सरकार असते, झेंडा असतो, प्रशासन असते. या सर्व गोष्टी विचारात घेतल्या तर व्हॅटिकन हा जगातला सर्वांत छोटा देश ठरतो.

इटलीतील रोम शहरात मध्यभागी कॅथॉलिक ख्रिश्चनांचे सर्वोच्च धर्मपीठ आहे. व्हॅटिकन सिटी हे त्याचे नाव. व्हॅटिकन हे शहर राज्य १९२९ साली इटालियन सरकार व पोप यांच्यामधील एका कराराने अस्तित्वात आले आहे. यावर पोप म्हणजे कॅथॉलिक ख्रिश्चनांचे सर्वोच्च धर्माधिकारी यांची सत्ता असते.

व्हॅटिकन सिटीला स्वतःचा ध्वज आहे, पोस्ट खाते आहे, टेलिफोन यंत्रणा आहे, नभोवाणी व दूरचित्रवाणी आहे, रेल्वे स्थानक आहे आणि एवढे सगळे असलेल्या या देशाच्या भूमीचा विस्तार ०.१७ चौरस मैल आहे. या देशाची अर्थव्यवस्था दुनियाभर पसरलेल्या कॅथॉलिक ख्रिश्चनांच्या देणग्यांवर अवलंबून असते. व्हॅटिकन सिटीच्या वकिलाती निरनिराळ्या देशांत प्रस्थापित करण्यात आलेल्या आहेत. थोडक्यात म्हणजे स्वतंत्र देशातील सर्व गोष्टी येथे आढळतात. फक्त एका महत्त्वाच्या गोष्टीचा येथे उल्लेख करायला हवा; इतर राष्ट्रांचे राष्ट्रप्रमुख जन्माने त्या देशाचे नागरिक असावे लागतात. व्हॅटिकनचे राष्ट्रप्रमुख हे मात्र जन्माने व्हॅटिकनचे नागरिक असतातच असे नाही.

## सूड

एक बोकड एका बागेत शिरला व एका फुलझाडांची पाने खाऊ लागला. तेव्हा ते झाड त्याला म्हणाले, 'अरे, कुरणातलं कोवळं गवत खायचं सोडून मला विनाकारण त्रास का देतोस ? तुला असं वाटतं काय की हे गरीब झाड आपलं काय करणार आहे ? पण तू लक्षात ठेव की, जेव्हा तुला देवापुढे बळी द्यायला नेतील तेव्हा तुझ्या गळ्यात जी फुलांची माळ घालतील तिला लागणारी फुलं मी देईन अन् तुझा सूड घेतल्याशिवाय कधीही सोडणार नाही !'

तात्पर्य - माणूस कितीही दुर्बल असला तरी त्याला जर एखाद्याने विनाकारण त्रास दिला, तर त्याचा सूड काही प्रमाणात तरी तो घेतल्याशिवाय राहणार नाही.

# रहमते दर्शन (भाग - १)



## मौत के पंजे से छुड़ाना

हो, वह तुम्हें ही मिलेगा और १३ अप्रैल को यह मकान तुम्हारे नाम लिखा जायेगा। इसके अतिरिक्त मेरे पास एक और मकान था जो बिक नहीं रहा था। तभी कुछ दिन बाद उसका ग्राहक भी आ गया और कुछ और पैसे लेकर उस मकान (जिसे मैं लेना चाहता था) के मालिक से सौदा हो गया और वह मकान ठीक १३ अप्रैल के दिन मेरे नाम लिखा गया ।

मैंने महाराज कृपालसिंह जी के दर्शन सबसे पहले सन् १९६८ में किसी सत्संगी के माध्यम से किये। इससे पहले मैं ऋद्धि-सिद्धि करता था। इस कर्म के करते हुए मुझे पता लग जाता था कि फलाँ जगह धन गड़ा है। वह धन निकाल कर ग़रीबों की सेवा में लगा देता था, कभी किसी से कोई पैसा नहीं लेता था। १९७४ में महाराज जी के चोला छोड़ने के बाद फिर से मैं ऋद्धि-सिद्धि में लगा रहा। मैं वॉटर टैंक पर Pump Operator के पद पर R.B.I. की तरफ से नियुक्त था। एक बार किसी मुरम्मत के काम से मैं टैंक पर चढ़ रहा था। मेरा पैर फिसल गया। मैं जैसे ही नीचे आ रहा था तो एकदम दो हाथ प्रकट हुए और मुझे हाथों में ले लिया और मुझे ज़मीन पर खड़ा कर दिया। मैं देखता रहा कि मेरी ऋद्धि-सिद्धि कहाँ गई, तो मेरे साथियों ने बताया कि स्वयं कृपालसिंह जी ने आपको बचाया और हमें भी आपके कारण उनके दर्शन हो गये। फिर सुबह तीन बजे मुझे संत कृपालसिंह जी के प्रत्यक्ष दर्शन हुए। मैंने कहा, महाराज जी! मैं धोखे में रहा क्योंकि मुझे १९६७ से अब तक नामदान नहीं मिला और आप चोला छोड़ चुके हैं।' उन्होंने मुझे 'पिता-पूत' पढ़ने के लिए कहा।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

## दिमाग की शक्ती

जब हम किसी को स्पर्श करते हैं तो एक अजीब सा अहसास होता है। खासतौर पर विपरीत लिंग का स्पर्श । माता पिता या दादा दादी जब हमारे सिर पर या पीठ पर हाथ रखते हैं तो हमें वह स्पर्श याद रहता है। इस लिये जो पाठयक्रम है, जो शक्तियां चाहते हैं, उनकी आवर्ती को मन से स्पर्श करें। आप को बहुत अच्छा लगेगा। स्पर्श सुख के कारण हम सारा जीवन परिवार के लोगों की सेवा में लगा देते हैं। जो याद रखना हो उसे विपरीत लिंग का चित्र दो और मन से स्पर्श करते रहो, वह सब आप के जीवन में होने लगेगा। दिमाग और स्मृति नाश नशे की अवस्था में मानसिक सन्तुलन और स्मृति नाश होता है। मृत्यु के तीव्र दु:ख से पूर्व जन्म की स्मृति भूल जाती है। इस जीवन में भी तीव्र दु:ख स्मृति नाश का कारण बन जाता है। अत्यधिक आसक्ति भी स्मृति नाश का कारण बनती है। अत्यधिक रोष से भी स्मृति नाश होता है।

जब व्यक्ति का मन किसी वस्तु या एक व्यक्ति में आसक्त हो जाता है तो दूसरी चीजें भूल जाती हैं। जुआ खेलने में व्यस्त व्यक्ति को अन्य किसी बात का स्मरण नहीं रहता। मोह के कारण भी स्मृति नाश होता है। मोहित व्यक्ति उचित अनुचित में भेद नहीं कर पाता इस लिये उसकी विवेक शक्ति नष्ट हो जाती है।

सम्मोहन से भी स्मृति भ्रमित होती है जिस से बुद्धि और स्मृति का नाश होता है। शारीरिक और मानसिक व्याधियां भी स्मरण में बाधक बनती हैं। शरीर में रजोगुण और तमोगुण बढ़ जाने से भी स्मृति नाश होता है। रजो और तमोगुण की वृद्धि में हम दूसरों का नुकसान कर देते हैं, जिस से वह लोग प्रतिरोध करते हैं। उनके प्रतिरोध से दु:ख पैदा होता है और दुःख से स्मृति नाश होती है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# साहित्य सहवास - 'क्षणा-क्षणाला...'

शाळा सुटल्यावर, दप्तर घेऊन विद्यार्थी निघाले की आपण शिक्षण घेत होतो, तो काळ डोळ्यांसमोर दिसतो. वर्ग, वर्गातले अंक-अक्षरांचे तक्ते, पाढ्यांचे तक्ते, पक्षी, प्राणी ह्यांचे तक्ते, शिकवणारे शिक्षक, शाळा भरतेवेळी आणि सुटल्यावर वाजणारी घंटा, अभ्यास, परिक्षा, मिळालेले गुण हे सगळं शिक्षणात सामावलेलं आहे. शिक्षण ह्या शब्दाची फोड शि आणि क्षण. अर्थात प्रत्येक क्षणी शिकणं. शाळा, महाविद्यालयात पुस्तकांतुन शिकतो. परिक्षेत प्रश्नांची उत्तरं लिहितो. गुण मिळतात गुणांवरुन सदर विद्यार्थी किती हुशार आहे हे समजतं. वर्गात, जो विद्यार्थी, सर अथवा मॅडम शिकवंत असतांना, एकाग्रतेनं ऐकतो, आत्मसात करतो, शिवाय घरीसुध्दा पुन्हा वाचन-लेखन करतो, तो विद्यार्थी योग्य उत्तरं लिहितो. चांगले गुण मिळवतो. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर व्यवसाय अथवा नोकरी करतो. शाळा, महाविद्यालयात पुस्तकं, वही, पेन, ह्यांचा उपयोग करुन शिक्षण घेतलं जातं. एका विशिष्ट वयानंतर पुस्तकं, वही, पेन असं काहीही उपयोगात न आणता शिकावं लागतं. त्यावेळी विद्यार्थी दशेत जे शिक्षण घेतलं, त्याचा योग्य उपयोग करावाच लागतो. त्या विशिष्ठ वयात डोळ्यांना जे दिसतं, त्यावर विचार, मनन करुन शिकावं लागत. थोडक्यात असं म्हणता येईल की प्रत्येक व्यक्ती आयुष्यभर विद्यार्थी असतो. अखेरच्या श्वासापर्यंत शिकता येतंच.

शाळेतील कथाकथन स्पर्धेत पंचवीस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. ह्या स्पर्धेत तुमचा स्पर्धक क्रमांक अकरा असेल तर अधीच्या दहा स्पर्धकांच्या आणि तुमच्यानंतरच्या चौदा स्पर्धकांच्या कथा तुम्ही ऐकल्याच पाहिजेत. निकाल जाहिर झाल्यानंतर तुमच्या लक्षात येईल की अमुक त्या विद्यार्थ्याचा कथाकथन स्पर्धेत प्रथम क्रमांक का आला? त्या विद्यार्थ्याच्या कथेचं शीर्षक, कथा, कथन करण्याची त्याची पध्दत, कथा व्यवस्थितपणे सर्वांना समजली का? कथेचा शेवट परिणामकारक आहे का ? ह्या प्रश्नांची उत्तरं मिळतीलंच. तुमच्या आधीच्या दहा आणि नंतरच्या चौदा, अशा एकुण चोवीस कथा ऐकतांना, प्रत्येक स्पर्धकाकडून, नक्कीच काही शिकता येईल. अर्थात पाहाणं, ऐकणं आणि करणं हा शिक्षणाचा अविभाज्य भाग आहे. समजा, तुम्ही सोडुन उर्वरित चोवीस स्पर्धकांच्या कथा ऐकल्या नाही, समजुन घेतल्या नाही, तर काहीच माहिती होणार नाही, शिकणं होणारंच नाही. दैनंदिन जीवनात अनेक विचार, कृती, व्यक्ती आपल्याला दिसतात, भेटतात. त्या विचार, कृती आणि व्यक्तींविषयी वाईट विचार केला, तर वाईटच शिकायला मिळणार. ह्याऊलट त्या विचार, व्यक्ती आणि कृतीविषयी चांगला विचार केला तर फायदाच होईल. प्रत्येक क्षणी काही शिकलोच नाही तर ? ह्या एका प्रश्नातुन शिक्षणाचं महत्व, लक्षात येईल. शाळा, महाविद्यालयीन जीवनात अर्थातंच विद्यार्थी दशेत असतांना, परिक्षेत प्रश्नपत्रिका मिळते. केलेल्या अभ्यासानुसार उत्तरं लिहिली जातात. मोठ्या व्यक्तींसमोर कागदांची प्रश्नपत्रिका नसते, तर अदृष्य प्रश्नपत्रिका असते. ह्या अदृष्य प्रश्नपत्रिकेतील, प्रश्नांची उत्तरं योग्य असण्यासाठी शालेय शिक्षणासोबतंच, अनुभवाचं शिक्षण उपयोगी पडतं. अनुभव हा आपला शिक्षक असतो. एखादी व्यक्ती शाळेतंच गेली नाही. तर त्या व्यक्तीला ना सर्वांगिन विचार करता येणार, ना उत्तरांच्या रुपातली कृती करता येणार. अंक आणि अक्षरांची ओळखंच झाली नाही त्याला व्यवहार ज्ञान मिळणार नाही. नेमकं काय केलं म्हणजे प्रगती होईल हेसुध्दा त्याला समजणार नाही. नोकरीच्या अपेक्षेने शिक्षण न घेता, घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग करुन व्यवसाय करता येऊ शकतो. शिक्षणामुळेच समजतं प्रश्न आणि उत्तर, हा जीवनाचा अविभाज्य भाग का आहे ? क्षणोक्षणी शिकलो तरंच आपण जीवनात येणाऱ्या संकटांचा सामना करु शकु. एखाद्या कॉलनीत वीस घरं आहेत. प्रत्येक घराने, दररोजच्या कमाईतले वीस रुपये रोज बाजुला ठेवले तर दररोजचे चारशे रुपये होतील. ह्या हिशोबाने वर्षाचे एक लाख शेहेचाळीस हजार रुपये होतील. ह्या पैश्यांतुन, कॉलनी, काही मुलं शिक्षणासाठी दत्तक घेऊ शकेल. आपण घेतलेल्या ज्ञानाचा योग्य उपयोग केला तर घेतलंल शिक्षण सार्थकी लागेलंच. अनेक गरजुंना शिक्षण मिळेल. प्रत्येक क्षणी चांगलं असं शिकलो तर प्रगतीच होणार आहे. ही प्रगती फक्त वैयक्तिक नसेल तर कौटुंबिक, सामाजिक असेल. जगातल्या प्रत्येक गरजवंताच्या पाठिशी कुणीही एकटा उभा राहु शकणार नाही. पण प्रत्येकानं ठरवलं तर किमान एका गरजवंताच्या पाठिशी उभा राहु शकतोच.

(लेख क्र.५३३)

**- सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

८) ऑपरेशन थिएटर पाहिल्यानंतर प्रसूतीनंतर बाळाला काही प्रॉब्लेम आलाच, तर तिथे पटकन बाळाला ईमर्जन्सी हाताळण्यासाठी वॉर्मर, फोटोथेरपी, ऑक्सिजन यांच्या सुविधा आहेत की नाही ते पाहावे.

९) प्रसूतिगृहात गेल्यावर येणाऱ्या औषधांचा खर्च, सुलभ प्रसूतीचा, सिझेरियनचा खर्च किती येतो याचा अंदाज घ्यावा, म्हणजे त्या प्रमाणे पैसे तयार ठेवून बरोबर नेता येतात. डॉक्टरांनी दिलेली प्रसूतीची तारीख उलटल्यास घरी बसू नये. ताबडतोब दवाखान्यात दाखल व्हावे, नाही तर बाळ पोटात गुदमरण्याची शक्यता असते.

## प्रसूतिअवस्था

गर्भवती स्त्रीची जर पहिली खेप असेल, तर तिच्या मनात प्रसूतीबद्दल भीती, अनेक प्रकारच्या शंका असतात. मला प्रसूतीच्या वेदना, त्रास सहन होईल का, कोणत्या वेळी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होण्यासाठी जावे हे मला समजेल का? या शंकांचे निरसन करण्यासाठी प्रसूतिअवस्था कशी असते; त्यात कोणती लक्षणे असतात याची माहिती खाली माहिती देत आहोत. प्रसूती होण्यापूर्वी खालीलप्रमाणे १ किंवा २ लक्षणे आढळतात.

१) अचानक योनीतून लाल-पिवळसर प्रवाही पदार्थ वाहू लागतो.

२) थोड्या थोड्या अंतराने ओटीपोटात दुखणे, साधारणतः थोड्या थोड्या अंतराने दुखते व परत थांबते. यालाच आपण कळा येणे असे म्हणतो.


३) योनीतून पांढऱ्या रंगाचे लघवीप्रमाणे एकदम पाणी जाणे यालाच वरमुठ (amniotic fluid) फुटणे असे म्हणतात.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# विथ मटेरीअल कामाची संकल्पना आणि अहिल्यानगरमध्ये वृद्धीची आवश्यकता





विथ मटेरीअल बांधकामाची याची संकल्पना सांगण्याआधी मला एक गोष्ट सांगावीसी वाटते, कि जुन्या काळात गावी अथवा शहरात एखादया व्यक्तीच्या बांधकामाची सुरुवात करायची असल्यास अंगावर काम देणे उगते काम देणे या शब्दांचा सर्रास वापर होत असे.

जुन्या काळी एक म्हण प्रचलित होती घर पाहावं बांधून आणि लग्न पाहावं करून, म्हणजे या दोन्ही कामात कोणत्या, कशा आणि किती अडचणी येतील किंवा किती प्रकारचे गोंधळ उडतील हे सांगता येणे अशक्य. त्यामुळे प्रत्येकाने स्वानुभव आणि जे त्यातून गेलेत त्यांचा सल्ला घ्यावा असा त्याचा अर्थ.

**विथ मटेरीअल बांधकाम म्हणजे नेमके काय**

बंगला, अपार्टमेंट अथवा कुठल्याही प्रकारचे बांधकाम यांचे काम करताना पुण्या मुंबई सारख्या ठिकाणी लॉक ॲण्ड की हा शब्द प्रचालित आहे म्हणजे विकसक याने कॉन्ट्रॅक्टर यांच्याकडे बंगला अथवा इमारत यांचे सुरुवातीपासून शेवट पर्यंतचे काम एका ठराविक रकमेस ठरवून देणे. यासाठी कॉन्ट्रॅक्टर हे काम करण्यास सर्व दृष्टीने सक्षम आहे कि नाही याची पडताळणी करणे विकसकासाठी अनिवार्य असते. यामध्ये विकसक यांना एकदा काम ठरवून दिल्यावर काही पाहण्याची आवश्यकता नसते.

**विथ मटेरीअल बांधकामाची पद्धती**

विथ मटेरीअल काम करताना सर्वप्रथम तीन महत्वाच्या गोष्टींची गरज पडते. १) बंगला अथवा स्कीम प्लॅनचे स्केचेस बनवून विकसक अथवा ओनरच्या गरजेप्रमाणे प्लॅन फायनल करणे, त्यानंतर त्यासाठी आर्किटेक्ट अथवा इंजिनिअर मार्फतसर्व शासकीय परवानग्या घेऊन रीतसर परवानगी घेणे. कामासाठी आवश्यक सर्व वर्किंग, डिटेल ड्रॉइंग आणि थ्री डी व्ह्यू बनवणे. २) कामाचे सर्व आर सी सी डिझाइन, डिझाइनर कडून घेणे. ३) वरील सर्व ड्रॉइंगप्रमाणे ओनर अथवा विकसकाबरोबर कामाचे सर्व स्पेसिफिकेशन ठरवून घेणे.

वरील तीनही प्रकारची कागदपत्रे वापरून विथ मटेरीअल काम करणारा कॉन्ट्रॅक्टर त्याचा व्यवस्थित अभ्यास करून कामाचे कोटेशन देऊ शकतो. विकसक कॉम्पेटीशन अथवा तुलनात्मक अभ्यासासाठी टेंडर काढून एकापेक्षा जास्त व्यक्तींचे कोटेशन घेऊ शकतो. परंतु काम करताना फक्त कोटेशन कमी आले असल्याने तो कॉन्ट्रॅक्टर फायनल न करता इतरही निकष तपासणे आवश्यक असतात. ताजमहालचे काम करताना शाहजहानने कमी रेट मध्ये काम करणारे मजूर वापरले असते तर इतकी चांगली वास्तू अस्तित्वात आली नसती. त्यामुळे कामाचा दर्जा आणि वापरले जाणारे दर्जेदार साहित्य तसेच कुशल कामगार हे सुद्धा तितकेच महात्वाचे आहेत.

**विथ मटेरीअल बांधकाम ठरवून देताना विकसक यांनी पडताळणी करावयाचे निकष**

कॉन्ट्रॅक्टर हा टेकनिकल क्वालिफाइड असावा. सदर काम करण्यास कॉन्ट्रॅक्टर आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे का ? कॉन्ट्रॅक्टरचा मार्केट मध्ये आधी इतर विकसक अथवा ओनर यांच्या केलेल्या कामाचा अनुभव म्हणजेच कुशल कामगार आणि स्टाफ , कामाची पद्धत, दर्जा, वेळेत काम पूर्ण करणे, वैयक्तिक कामासाठी वेळ आणि लक्ष देणे, आर सी सी कामासाठी वापरणारे सेंटरिंग मटेरीअल यांची पडताळणी आवश्यक आहे. आर्किटेक्ट, इंजिनिअर, आर सी सी डिझायनर आणि विकसक यांचातील समन्वय या गोष्टी महत्वाच्या आहेत.

**विथ मटेरीअल काम दिल्याने विकसक अथवा ओनर यांना होणारे फायदे**

१) व्यवस्थित स्पेसिफिकेशन ठरवून विथ मटेरीअल काम दिल्यानेविकसक यांना कामासाठी बुकिंग घेणे, संबंधित इमारतीची इंटेरीअर कामांचे डिझाइन आणि इतर कामासाठी वेळ देता येतो. २) कॉन्ट्रॅक्टर यांना काम करण्यास फ्री हँड मिळाल्याने दर्जेदार काम करण्यास पुष्कळ वाव मिळतो कारण कामाचे ॲग्रीमेंट ठरलेले असल्याने विकसक यांचा त्यामध्ये जास्त हस्तक्षेप राहत नाही. ३) विकसक यांचा कामाकडे लक्ष देण्याच्या मोठ्या वेळेत बचत होते. ४) सुपरव्हिजन साठी वेगळी रक्कम द्यावी लागत नाही पार्यायाने तो खर्च वाचतो. ५) कॉन्ट्रॅक्टर तांत्रिक शिक्षण घेतलेला असल्यास कामाचा दर्जा उच्च राहण्याचे प्रमाण अधिक असते. ६) विथ मटेरीअल काम करताना सर्व स्पेसिफिकेशन नमूद केलेले ॲग्रीमेंट केलेले असल्यास अनावश्यक वाद विवाद टाळले जातात. ७) विथ मटेरीअल कामामध्ये कामाच्या एकूण खर्चाचा सुरुवातीला अंदाज येतो त्यामुळे मार्केट मध्ये मटेरीअल रेटमध्ये चढउताराचा ताणताणाव विकासक यांच्यावर रहात नाही. ८) प्लॅन अथवा ॲग्रीमेंटस्पेसिफिकेशन मध्ये बदल झाल्यास त्याबाबत तरतूद किंवा मार्केट रेटप्रमाणे बदल करण्याचा क्लॉज त्यामध्ये असावा. ९) कामात काही गोष्टीबाबत मतभेद झाल्यास अर्बीट्रेटर अथवा मेडीटेटर म्हणजेच मध्यस्थ यांची नेमणूक करणेबाबत ॲग्रीमेंट मध्ये उल्लेख असावा.

**विथ मटेरीअल कामांचे प्रमाण वाढविण्यासाठी आवश्यक गोष्टी**

१) बऱ्याच प्रमाणात विकसक यांची मानसिकता विथ मटेरीअल कामदिलेला कॉन्ट्रॅक्टर हलक्या दर्जाचे बांधकाम साहित्य वापरून जास्त नफा कमावणे हा उद्देश ठेऊन काम करतील व आपली फसवणूक होईल अशी असते. यासाठी कॉन्ट्रॅक्टर यांनी काम करताना विकसक यांच्यामध्ये आपल्या पारदर्शक आणि चांगल्या बांधकामाच्या कृतीमधून त्यांना या गोष्टी पटवून देणे आवश्यक आहे. २) विकसक यांना समाधानी ठेवण्यासाठी कॉन्ट्रॅक्टर यांनी आपल्या स्वभावात आक्रमकता न ठेवता तसेच जास्त नफ्याची अपेक्षा न ठेवता दर्जेदार कामांच्या माध्यमातून आपले नावलौकिक जपणे गरजेचे आहे. ३) कामाच्या सुरुवातीच्या टप्प्यापासून विकसक यांच्या बांधकामातील अडचणी बाबत योग्य वेळी शंकानिरसन करावे आणि कामावर चांगली वातावरण निर्मिती करावी हि कॉन्ट्रॅक्टर अथवा इंजीनिअर यांची महत्वाची जबाबदारी आहे. ४) कॉन्ट्रॅक्टर अथवा इंजीनिअर यांनी कामासाठी दिलेल्या सर्व एजन्सी तांत्रिकदृष्टीने सक्षम असाव्यात, आधुनिक तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करावा. ५) एकदा टेंडर दिल्यावर व ॲग्रीमेंट फायनल झाल्यावर कॉन्ट्रॅक्टर अथवा इंजीनिअरने त्याप्रमाणे काम फायनल करणे अपेक्षित असते. मटेरीअल रेट मधील चढउतार अथवा इतर अडचणीमुळे कामात नफा कमी राहिला अथवा नुकसान झाले तरी काम योग्यप्रकारे पूर्णत्वास नेण्याची नैतिक जबाबदारी कॉन्ट्रॅक्टर अथवा इंजीनिअरने घ्यावी. यासाठी कॉन्ट्रॅक्टर अथवा इंजीनिअरची मानसिक कणखरता कमी येते. ६) ॲग्रीमेंट मध्ये पेमेंट शेड्युल दोन्ही पार्टीला योग्य, सुटसुटीत आणि विनाअडथळा काम पूर्णत्वास जाईल असे असावे.

**अहिल्यानगरकर आणि शहरातील तसेच जिल्यातील विकासकांसाठी आवाहन**

नगर शहर सुशोभित आणि सुंदर करण्यात बांधकाम क्षेत्रातील तांत्रिक शिक्षण घेतलेले कॉन्ट्रॅक्टर आणि इंजीनिअर यांचा खूप मोठा सहभाग असतो. थोडासा कमी खर्च लागेल या आमिषास बळी पडून आपल्या आयुष्याची पुंजी अकुशल आणि अशिक्षित ठेकेदारांकडे विथ मटेरीअल काम देणे यात खूप मोठा धोका आहे. शहरात बहु मजली इमारतींचे प्रमाण आता वाढणार असून त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, नवनवीन बांधकाम साहित्य आणि मजुरांकडून काम करून घेणारे कॉन्ट्रॅक्टर आणि इंजीनिअर हेच सक्षमपणे विकसक यांच्या आशा अपेक्षा पूर्ण करून भविष्यात कमीत कमी मेंटेनन्स राहील याप्रमाणे काम करून आपल्या कसोटीला उतरून उत्तम सेवा देतील यात वाद नाही.

आर्किटेक्ट, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर या संस्थेच्या माध्यमातून वर्षभर विविध कार्यशाळा, तांत्रिक सेमिनार, तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन हे तांत्रिक कॉन्ट्रॅक्टर आणि इंजीनिअरयांना आणखी सक्षम करण्याचे काम करत असते. विथ मटेरीअल काम दिल्यास होणाऱ्या सर्व फायद्याचा विचार करून अहिल्यानगरकरांनी शहर फक्त बाह्यरूपाने सुंदर न दिसता आतूनही तसे भक्कम आणि सदृढ होण्यासाठीतांत्रिक कॉन्ट्रॅक्टर आणि इंजीनिअर यांच्याकडूनच कामे करून शहरविकासात आपला सहभाग नोंदवावा.

इंजि. अन्वर शेख यांनी मागील बावीस वर्ष्यापासून नगर शहर व जिल्हा तसेच पुण्यात बंगले, अपार्टमेंट, शैक्षणिक संकुल, हॉस्पिटल, हॉटेल्स अश्या विविश प्रकारची विथ मटेरीअल कामे केली आहेत. टायनी केलेल्या राज पॅलेस या हॉटेल प्रोजेक्टला तसेच केडगाव येथील डॉ. आशुतोष जोशी यांच्या बंगल्याला एसा बेस्ट स्ट्रक्चर अवार्ड पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

**– इंजि. अन्वर शेख**
**(सिव्हील इंजीनिअर)**
इंजिनियर, कॉन्ट्रॅक्टर व
आर्किटेक्चरल कन्सल्टंट,
माजी अध्यक्ष – आर्किटेक्ट, इंजिनिअर्स
ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन,
अहिल्यानगर
आयकॉन इन्फ्राटेक
२७–२८, सेक्टर नं ५,
एम आर ट्रेड सेंटर,
वाडिया पार्क, अहिल्यानगर,
मोबा. नं : ९८५०९६१११२



ICON INFRATECH

आर्किटेक्टस्, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहमदनगर
AESA
www.aesanagar.com

# कॉम्प्युटर कोर्स विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी अतिशय गरजेचे

**आ.संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; दिशा कॉम्प्युटरच्यावतीने कॉम्प्युटर कोर्सला सवलत**



आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते दिशा कॉम्प्युटर दिल्ली गेट शाखा सवलत पोस्टरचे अनावरण करताना संचालक शाम मुळे, उमेश कुलाळे, विशाल दहातोंडे, कैलास केळकर आदी. (छाया – यतीन कांबळे)

नगर – आज कॉम्प्युटर शिक्षण हे साक्षरतेचे लक्षण झाले आहे, त्यामुळे प्रत्येकाला कॉम्प्युटर येणे हे क्रमप्राप्त आहे. आज शालेय विद्यार्थ्यांपासून कॉलेजपर्यंतच्या विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर कोर्स हे अनिर्वाय झाले आहे. नियमित अभ्यासबरोबर कॉम्प्युटर कोर्स केल्यास नोकरीची चांगल्या संधी मिळत असते. दिशा कॉम्प्युटरने राज्यात विविध शाखांच्या माध्यमातून हजारोंना विद्यार्थ्यांना विविध कोर्सच्या माध्यमातून सक्षम करण्याचे काम करत आहे. सर्वसामान्य घरातील विद्यार्थ्यांना अल्पदरात कोर्स उपलब्ध व्हावे, यासाठी कॉम्प्युटरने चांगली संधी उपलब्ध करुन दिली आहे. या कोर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आवश्यक ते ज्ञान मिळून त्यांना भविष्यात योग्य दिशा मिळेल तसेच विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्यासाठी देखील गरजेचे आहे, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

अहिल्यानगर दिल्लीगेट, पाईपलाईन व माळीवाडा येथील दिशा कॉम्प्युटरच्यावतीने मोठी सवलत कोर्सच्या पोस्टरचा शुभारंभ आ.संग्राम जगताप यांच्या हस्ते झाला. यात कोणताही कोर्स फक्त १४५०/– मध्ये देण्यात आला आहे. याप्रसंगी संचालक शाम मुळे, उमेश कुलाळ, सूरज केळकर, महेश सुरसे, विकास जाधव, विनायक नेवसे, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते

प्रास्तविकात शाम मुळे म्हणाले, कॉम्प्युटरच्या माध्यमातून गेल्या १६ वर्षांपासून विविध कोर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सखोल ज्ञान देऊन त्यांना सक्षम करण्याचे काम करण्यात येत आहे. प्रत्येक क्षेत्रातील नवनवीन बदलांचा स्विकार करुन त्यापद्धतीचे शिक्षण दिशा कॉम्प्यूटर मधून दिले जात असल्याने विद्यार्थी परिपूर्ण होऊनच बाहेर पडतो. आज सवलतीच्या दरात अनेक कोर्स उपलब्ध करुन देत मोठी संधी उपलब्ध करुन दिली आहे. दिशा कॉम्प्युटरच्या दिल्ली गेट, पाईपलाइन व माळीवाडा शाखेत ९ ते १८ जानेवारी या कालावधीत प्रवेश घेणार्या विद्यार्थ्यांसाठी विविध कोर्स फक्त १४५०/– मध्ये देण्यात येणार आहे. या संधीचा फायदा घेऊन आपल्या आवडता कोर्स करुन आपले करिअर घडवावे, असे आवाहन शाम मुळे यांनी केले.

# श्री बाणेश्वर महाविद्यालयातील रासेयो योजनेचा अनोखा उपक्रम

**एक घर एक स्वयंसेवक स्वच्छता अभियान**



बाणेश्वर महाविद्यालयातील रासेयो योजनेच्या अनोख्या उपक्रमांतर्गत स्वतःच्या घराच्या आसपासची व परिसराची साफसफाई करण्यात आली.

नगर – श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बुऱ्हाणनगर येथील राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर २०२४–२५ मौजे मांजरसुंबा येथे राबविण्यात येत आहे. यादरम्यान ९ जानेवारी चौथ्या दिवशी 'एक घर एक स्वयंसेवक' स्वच्छता अभियान हा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत ग्रामस्थांनी स्वयंसेवकांच्या मदतीने स्वतःच्या घराच्या आसपासची व परिसराची साफसफाई करण्यात आली.

त्याप्रसंगी गावातील सरपंच रुपालीताई कदम, उपसरपंच जालिंदर कदम, सर्व ग्रामस्थ यांचा प्रतिसाद मिळाला. या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष आ. शिवाजीराव कर्डिले व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.एम जाधव सर यांचे विशेष सहकार्य लाभले. हा उपक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. सागर कोहक, डॉ. स्वाती वाघ, प्रा. विठ्ठल कडूस, प्रा. पुनम राऊत व रासेयोचे सर्व स्वयंसेवक यांनी कष्ट घेतले.

# काकासाहेब म्हस्के स्मृती पुरस्कारांचे १२ जानेवारी रोजी होणार वितरण

**पुतळ्याचे होणार अनावरण, वंध्यत्व विषयावर इंटर सिस्टीम सेमिनारचे आयोजन**



नगर – काकासाहेब म्हस्के मेमोरियल मेडिकल फाउंडेशनच्या वतीने दरवर्षी देण्यात येणाऱ्या काकासाहेब म्हस्के स्मृती पुरस्कारांचे वितरण १२ जानेवारी रोजी कै. काकासाहेब म्हस्के यांच्या ४४ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित करण्यात आले असल्याची माहिती संस्थेचे कार्यकारी विश्वस्त डॉ.सुभाष म्हस्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ.म्हस्के पुढे म्हणाले की, यंदा आरोग्य भूषण या पुरस्काराने जनसेवा फाउंडेशनचे संस्थापक डॉ. विनोद शहा यांचा सन्मान करण्यात येणार आहे. डॉ.शहा यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी केलेले कार्य राष्ट्रीय पातळीवर गौरविले गेले असून आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय असल्याचे ते म्हणाले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लखनऊ विद्यापीठ तसेच स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.सर्जेराव निमसे उपस्थित राहणार आहे.

या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विश्वस्त डॉ.सुमति म्हस्के, विश्वस्त डॉ.अभितेज म्हस्के, विश्वस्त डॉ.दिप्ती ठाकरे, संस्थेचे सीईओ आर्किटेक्ट समीर ठाकरे, काकासाहेब म्हस्के कॉलेजचे प्राचार्य डॉ.विवेक रेगे, काकासाहेब म्हस्के फार्मसी कॉलेजचे प्राचार्य नितीन ठुबे, पार्वतीबाई नर्सिंग इन्स्टिट्यूटचे प्राचार्य अजित चवरदार आदींनी केले आहे.

याप्रसंगी कै.काकासाहेब म्हस्के यांच्या पुतळ्याचे संस्था आवारात अनावरण करण्यात येणार असल्याचे डॉ. सुभाष म्हस्के म्हणाले. कै.काकांची नाळ आयुष्यभर सर्वसामान्य, गोरगरिबांशी जुळलेली होती. त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा जपण्याचा हा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी इंटर सिस्टीम सेमिनारचे आयोजन करण्यात आले असून यंदा वंध्यत्व या विषयावर डॉ.विनोद शहा यांच्यासह जागतिक आरोग्य संघटनेसोबत कार्याचा ठसा उमटवलेले डॉ. सुभाष साळुंखे हे विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना मार्गदर्शन करणार असल्याचे ते म्हणाले. तसेच डॉ.शहा आणि डॉ. साळुंखे या बी.जे मेडिकल कॉलेजच्या माझ्या वर्गमित्रांचे आम्हाला कौतुक वाटत असल्याचे डॉ.म्हस्के म्हणाले.

डॉक्टर सुभाष म्हस्के म्हणाले की बी.जे मेडिकल कॉलेजला असताना डॉक्टर विनोद शहा, डॉक्टर सुभाष साळुंखे आणि मी असे आम्ही तिघेही वर्गमित्र होतो. डॉक्टर साळुंखे यांनी जागतिक आरोग्य संघटनेचे प्रतिनिधी प्रतिनिधी म्हणून केलेले कार्य हे कौतुकास्पद आहे. जागतिक स्तरावर नामांकित असलेल्या संघटनेसोबत आपल्या सहकाऱ्याने काम करावे हे खूपच अभिमानास्पद असल्याचे डॉ.म्हस्के म्हणाले

# मिनी गोल्फ स्पर्धेत पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या खेळाडूंचे यश




मिनी गोल्फ स्पर्धेत पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या खेळाडूंचे यश मिळविल्याबद्दल सर्व खेळाडूंचे स्कूलच्या वतीने सत्कार करण्यात आला.

नगर – शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, अहील्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'मिनी गोल्फ स्पर्धा' सारडा कॉलेज, अहिल्यानगर या ठिकाणी आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

**सर्व खेळाडूंची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड**

स्पर्धेमध्ये १४ वर्ष आतील मुलींमध्ये अमिथी राखडे, वैदही ठमके, सिद्धी आगरकर, आंचल काळे या विद्यार्थिनी यशस्वी ठरल्या. तर १७ वर्षे वया अंतर्गत स्वरा तांबे, ओवी सराफ, श्रेया उंडे आणि आर्या देठे हे विजयी झाले. तर मुलांमध्ये १४ वर्ष वयाअंतर्गत शिवांग गुंजेकर, देव लोढा, वेदांत काळे, श्रीवर्धन धनगुडे यांनी यश संपादन केले, तर १७ वर्षा वयाच्या आतील मुलांमध्ये अथर्व कोल्हे, दर्श देसरडा, वरद ससे आणि रुद्र आहेर यांनी यश मिळवले. १९ वर्षे अंतर्गत मुलींमध्ये पूर्वी कट्टर, नेतल भुतडा, अनुष्का कांकरिया, श्रेया पाठक तर मुलांमध्ये रचित ननवरे, श्लोक लहाटे, प्रसाद झरेकर, दुर्वेश कोतकर यांनी उत्तेजनार्थ म्हणून यश संपादन केले.

सर्व विद्यार्थ्यांचे पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सर्व यशस्वी खेळाडूचे शाळेचे प्राचार्य मंगेश जगताप व उपप्राचार्य शगुप्ता काझी, आशितोष नामदेव यांनी कौतुक केले. खेळाडूंना अंतरराष्ट्रीय खेळाडू क्रीडा शिक्षक सीमा लाड सचिन पठारे यांचे मार्गदर्शन लाभले.

# सहायक कमांडंट अमित काकडे यांना सीआरपीएफ महानिदेशक डिस्क व प्रशंसा पत्र घोषित



नगर – केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF) मध्ये सहायक कमांडंट या पदावर कार्यरत असलेले व सध्या आसाम मध्ये CRPF च्या क्विक ॲक्शन टीम (QAT) चे कमांडर म्हणून काम करत असलेले नगरचे पुत्र अमित महादेव काकडे यांना ULFA-I या उग्रवादी संघटने विरुद्ध केलेल्या उत्तम कामगिरीबद्दल CRPF महानिदेशक डिस्क व प्रशंसा पत्र घोषित झाले आहे.

अमित काकडे यांनी मार्च २०२४ मध्ये ULFA-I उग्रवादी संघटनेतील एक हत्यार बंद उग्रवादी पकडुन या संघटने विरुद्ध मोठी कामगिरी बजावली होती. या साठी त्यांना CRPF ने महानिदेशक डिस्क व प्रशंसा पत्र घोषित केले आहे. आसाम व नागालँड या राज्यांमध्ये उग्रवादी संघटने विरुद्ध कार्यवाही, तसेच ड्रग्स तस्करीचे नेटवर्क मोडून काढणे, असे काम अमित काकडे CRPF च्या क्विक ॲक्शन टीम (QAT) चे कमांडर म्हणून करत आहेत. तसेच मनपा पाणीपुरवठा विभागातील माजी इंजिनियर महादेव काकडे यांचे ते चिरंजीव आहेत.

# सॉफ्ट टेक कंपनीच्या 'ऑटो डी सी आर' या प्रणालीमुळे बांधकाम परवानगी काम सुरळीत व जलदगतीने होणार

## एसा सभासदांसाठी संगणक प्रणाली वापराविषयी प्रात्यक्षिक आणि वर्कशॉप

नगर – आर्किटेक्ट इंजिनीअर्स अ‍ॅण्ड सर्व्हेअर्स असो. अहमदनगर संस्था आणि पोलाद स्टील जालना यांच्या संयुक्त विद्यमाने महापालिका आणि टी पी मध्ये प्लॅन मंजुरी व तत्सम कामासाठी सॉफ्ट टेक कंपनीच्या संगणक प्रणाली वापराविषयी प्रात्यक्षिक आणि वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले होते. आतापर्यंत ऑनलाईन प्लॅन, ले आऊट आणि सबंधित बांधकाम मंजुरीसाठी सरकारमान्य बी पी एम एस ही एकच सिस्टीम उपलब्ध होती. परंतु आता डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंग यांच्या कार्यालयाने ऑटो डी सी आर या सिस्टीमला परवानगी दिली आहे. सॉफ्ट टेक कंपनीने विकसित केलेली ऑटो डी सी आर ही प्रणाली यासाठी शासनमान्य झालेली असून या सिस्टीम विषयी सविस्तर माहिती, त्याचा डेमो आणि सभासदांच्या शंकांचे समाधान यासाठी एसाने पोलाद स्टील यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. तुलनेने ही प्रणाली सोपी असून अहिल्यानगर महापालिकेत त्याअंतर्गत प्रकरणेही मंजूर झालेली आहेत. सॉफ्ट टेक कंपनीचे पुरुषोत्तम गोळेगावकर (डीव्हिजन हेड छत्रपती संभाजीनगर – नाशिक), अतुल वाळकुंडे (सिनिअर सपोर्ट असो. अँड टेक्निकल रीलेटेड पार्ट), इम्रान पठाण (सपोर्ट असो. ऑनलाईन ट्रेनिंग), गणेश म्हस्के (सपोर्ट असो.) यांनी सभासदांना मार्गदर्शन केले.


एसा सभासदांसाठी संगणक प्रणाली वापराविषयी प्रात्यक्षिक आणि वर्कशॉप घेण्यात आले. (छाया – लहू दळवी)

यावेळी बोलताना या सिस्टीमद्वारे आवश्यक असणाऱ्या विविध गोष्टींची माहिती गोळेगावकर यांनी सभासदांना करून दिली. अध्यक्ष आदिनाथ दहिफळे यांनी संस्था सभासदांना नवीन आलेल्या संगणक प्रणालीची माहिती होण्यासाठी वेळोवेळी आणखी ट्रेनिंग सेमिनार घेणार असल्याचे सांगून पोलाद स्टील आणि सॉफ्ट टेक हे यासाठी आपल्याला सहकार्य करणार असल्याचे सांगितले.

यावेळी उपाध्यक्ष विनोद काकडे, सुनिल औटी, भूषण पांडव, यश शहा, मयुरेश देशमुख, संतोष खांडेकर, जितेश सचदेव, सचिन डागा, अभिषेक महाले, नंदकिशोर घोडके, पंकज जहागिरदार, सतीश अरकल आणि सभासद उपस्थित होते. प्रदिप तांदळे यांनी सूत्रसंचालन केले. विनोद काकडे यांनी आभार मानले.

# श्री स्वामी समर्थांच्या मूळ गुरूपीठावरील पादुकांचे १२ जानेवारी रोजी अहिल्यानगर शहरात आगमन



नगर – अक्कलकोट येथील श्रीस्वामी समर्थांच्या मूळ गुरूपीठावरील परमसद्गुरू गजाजन महाराजांच्या चैतन्य पादुकांचे आगमन १२ जानेवारीला अहिल्यानगरमध्ये होणार आहे. पादुकांच्या स्वागताची जय्यत तयारी करण्यात आली आहे, अशी माहिती श्रीमती शोभनाताई वाळिंबे यांनी दिली.

त्या म्हणाल्या, १२ जानेवारीला सायंकाळी ६ च्या सुमारास सावेडीमधील अमित बँक कॉलनीमध्ये पादुकांचे आगमन होईल. तेथील योगेश अनासपुरे यांच्या निवासस्थानी पादुकांचे पूजन होऊन तेथेच मुक्कामी रहातील. १३ ते १७ जानेवारी दरम्यान या पादुकांचे शहरातील विविध भागातील भाविकांच्या निवासस्थानी पूजन करण्यात येईल. ज्या भाविकांना आपल्या निवासस्थानी पादुकांचे पूजन करण्याची इच्छा असेल त्यांनी अमित वाळिंबे यांच्याशी भ्रमणध्वनी क्रमांक ८८८८१५५०५५ वर संपर्क साधून नाव नोंदणी करावी.

१५ जानेवारीला सायंकाळी ५.३० ते ६.३० या वेळेत सिध्दी बागेतील महादेव मंदिराच्या प्रांगणात पादुका पूजनाचा सामुदायिक सोहळा संपन्न होईल. ज्या भाविकांना आपल्या निवासस्थानी पादुका पूजन करण्याची इच्छा होती ते येथे उपस्थित राहून पादुका पूजनासह दर्शनाचा लाभ घेऊ शकतील.

शहरातील अधिकाधिक भाविकांनी आपापल्या निवासस्थानी पादुका पूजनाचा आनंद घ्यावा, असे आवाहन सर्वश्री ल. य. कुवळेकर, सौ. ज्योती वाळिंबे आणि मिलिंद चवंडके यांनी केले आहे.


श्री स्थानकवासी जैन संघ व कंचन सेवा संस्था उदयपूर यांच्या संयुक्त विद्यमानाने प्राकृतिक चिकित्सा शिबिराचे शुभारंभ मर्चंट असोसिएशनचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार रमण मुथा व श्री स्थानिकवासी जैन संघाचे अध्यक्ष रमेश लोढा यांच्या हस्ते करण्यात आले. (छाया– अनिल पांडे)

### श्री स्थानकवासी जैन संघ व कंचन सेवा संस्था उदयपूर यांच्या संयुक्त विद्यमाने

# जैनस्थानकात १३ जानेवारीपर्यंत प्राकृतिक चिकित्सा शिबीर

श्रीरामपूर – श्री स्थानकवासी जैन संघ व कंचन सेवा संस्था उदयपूर यांच्या संयुक्त विद्यमानाने प्राकृतिक चिकित्सा शिबिराचे आयोजन १३ जानेवारी पर्यंत जैनस्थानक श्रीरामपूर येथे आयोजित करण्यात आलेले आहे. या शिबिराचा शुभारंभ मर्चंट असोसिएशनचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार रमण मुथा व श्री स्थानिकवासी जैन संघाचे अध्यक्ष रमेश लोढा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उदयपूर येथील डॉ. रामअवतार शुक्ला, श्री स्थानकवासी संघाचे विश्वस्त कल्याण कुंकुलोळ, विजय मुथा, गणेश गुजराणी, विजय चोरडिया, सुहास गांधी, महावीर रांका, हितेश धाडीवाल, माजी नगरसेवक नितीन पिपाडा, प्रकाश मुथा, शरद कोठारी, मर्चंट असोसिएशनचे संचालक स्वप्निल चोरडिया, दिगंबर जैन समाजाचे माजी अध्यक्ष अनिल पांडे, महावीर काला उपस्थित होते.

यावेळी रमण मुथा म्हणाले, श्री स्थानक जैन संघाच्यावतीने आयोजित करण्यात आलेले प्राकृतिक चिकित्सा शिबिराचा जास्तीत जास्त समाज बांधवांनी लाभ घ्यावा

शिबिरात विविध आजारावरती मोफत उपचार केले जाणार असून याचा समाज बांधवांनी लाभ घ्यावा असे आवाहन रमेश लोढा यांनी केले.

शिबिरात प्राकृतिक योग चिकित्सावर उपचार केले जात असून यात कंबर दुखी, लठ्ठपणा, प्रोस्टेट, ब्लड प्रेशर, अल्सर, गुडघ्याचे आजार, डायबिटीस, गॅस, मूत्र प्रॉब्लेम, अनिद्रा, थायरॉईड, ॲसिडिटी, हृदयरोग, त्वचारोग आदीसह विविध आजारावरती उपचार केले जाणार असल्याचे डॉ. राम अवतार शुक्ला यांनी सांगितले. शिबिरात डॉ. बिहारी शुक्ला यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. रामाअवतार शुक्ला, सहाय्यक शंकरलाल जगपाल, ज्ञानेंद्रिय, लक्ष्मी, पार्वती आदी सहसयोगी यात उपचार करत आहेत.

# महिलांनी सौंदर्यापेक्षा आरोग्याची काळजी घ्यावी

### ॲड. सुरेश लगड यांचे प्रतिपादन; बचत गटातील महिलांसह नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिराला युवक–युवतींचा प्रतिसाद

नगर – निरोगी आरोग्य असल्यास जीवनाचा खरा आनंद घेता येतो. महिलांनी कोणताही आजार अंगावर काढू नये, स्वतःची काळजी घेतल्यास कुटुंबाची काळजी घेता येणार आहे. आरोग्यावर सौंदर्य टिकून आहे. यासाठी महिलांनी सौंदर्यापेक्षा आरोग्याची काळजी घेणे जास्त महत्त्वाचे ठरणार आहे. दरवर्षी महिला वर्गाला व नागरिकांना सावित्री ज्योती महोत्सवाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात येत असलेल्या आरोग्य सुविधेची ॲड. सुरेश लगड यांनी कौतुक केले.


महाआरोग्य व रक्तदान शिबिराचे उद्घाटन विशेष जिल्हा सरकारी वकील ॲड. सुरेश लगड यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी शिबीरात सहभागी झालेले रक्तदाते आदी.

सावित्री ज्योती महोत्सवात बचत गटातील महिला व कार्यक्रमास भेट देणाऱ्या नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तर घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात युवक–युवतींचा प्रतिसाद लाभला. अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय, नेहरू युवा केंद्राच्या युवा कल्याण योजनेअंतर्गत महाआरोग्य शिबिर व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

जय युवा अकॅडमी, उडान फाउंडेशन, रयत प्रतिष्ठान, जीवन आधार प्रतिष्ठान, समर्पण बहुउद्देशीय संस्था, प्रगती फाउंडेशन, अहिल्या फाउंडेशन, मुंबादेवी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या महाआरोग्य व रक्तदान शिबिराचे उद्घाटन विशेष जिल्हा सरकारी वकील ॲड. सुरेश लगड यांच्या हस्ते झाले. यावेळी शहर बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. भूषण बऱ्हाटे, सुहासराव सोनवणे, संयोजक ॲड. महेश शिंदे, सुभाष जेजुरकर, आरती शिंदे, कांचन लद्दे, जयश्री शिंदे, बाबू काकडे, पोपट बनकर, कावेरी कैदके, अश्विनी वाघ आदींसह महिला बचत गटाचे प्रतिनिधी उपस्थित होत्या.

ॲड. भूषण बऱ्हाटे म्हणाले की, महिला व नागरिकांसाठी सातत्याने सुरु असलेले हे शिबिर सर्वात मोठी सेवा आहे. वेळेवर आरोग्य तपासणी केल्यास भविष्यातील मोठ्या आजाराचा धोका टाळता येतो. शिबिराच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या तपासण्या जीवनाला नवसंजीवनी देणारे ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महेश शिंदे यांनी प्रास्ताविकात दरवर्षी महिला व नागरिकांसाठी विविध आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येते. कुटुंबात व कामात व्यस्त असलेल्या महिला वर्ग आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. काहींची आर्थिक परिस्थिती असताना वेळ अभावी तर काही आर्थिक परिस्थिती अभावी आरोग्याकडे दुर्लक्ष होते. या महोत्सवाच्या माध्यमातून आरोग्य जपण्याचे कार्य देखील केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

या शिबिरात डॉ. दिलीप जोंधळे, डॉ. भास्कर रणनवरे, डॉ. किरण वैराळ, योगिता लांडगे, दिनेश लोंढे, डॉ. संतोष गिऱ्हे यांनी महिला व नागरिकांची आरोग्य तपासणी केली. या शिबिरासाठी इंडो आयरिश हॉस्पिटल, आनंद हॉस्पिटल, काकासाहेब म्हस्के मेडिकल कॉलेज, यशवंतराव चव्हाण डेंटल कॉलेज, जिल्हा रुग्णालय यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनंत द्रविड व अनिल साळवे यांनी केले. आभार दिनेश शिंदे यांनी मानले. या शिबिरासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी आमसिद्ध सोलनकर, नेहरू युवा केंद्राचे जिल्हा समन्वय अधिकारी संकल्प शुक्ला यांचे मार्गदर्शन लाभले.

# 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमांतर्गत श्री छत्रपती अभियांत्रिकीमध्ये कार्यशाळा

नगर – 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमांतर्गत ६ जानेवारी रोजी एक दिवसीय वाचन कौशल्य विषयक कार्यशाळा नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आली होती.


'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमांतर्गत श्री छत्रपती अभियांत्रिकीमध्ये कार्यशाळा घेण्यात आली.

यासाठी लाभलेले प्रमुख वक्ते न्यू आर्टस् कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजचे प्रा. डॉ. बापू चंदनशिवे यांनी विद्यार्थ्यांना निरंतर व सतत वाचनाची सवय, वाचूया व्यक्तिमत्व विकासासाठी, वाचनामुळे व्यक्तिमत्व विकास समृद्ध होतो आणि त्यासाठी काय वाचावे, कसे वाचावे, वाचन सवयी कशी लावावी यावर सखोल मार्गदर्शन केले. वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत पुस्तक परीक्षण म्हणजे काय आणि कसे करावे या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी वाचनाचे फायदे मुलांना सांगत विद्यार्थ्यांनी पुस्तक परीक्षण स्पर्धेमध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. खर्डे यांनी केले.

वाचन संस्कृती वृद्धींगत व्हावी, यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून महाविद्यालय स्तरावर वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा एक अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यशाळेसाठी समन्वयक म्हणून ग्रंथपाल प्रा. एस पी सुरोशी यांनी नियोजन केले.

महाविद्यालयाच्या वतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत महाविद्यालयात १ ते १५ जानेवारी या कालावधीत वाचन पंधरवडा आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून महाविद्यालयात वाचन कौशल्य कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या उपक्रमा अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन केलेले आहे. यामध्ये सामूहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा आदि उपक्रमांचा समावेश आहे. त्यामुळे या सर्व उपक्रमांचा सर्व विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी केले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ.वाय.आर.खर्डे, विभाग प्रमुख प्रा.पी.जी.निकम, डॉ.एम.के.भोसले, प्रा. एस. एम. वाळके, डॉ. व्ही.व्ही.पाटील, प्रा.ए.बी.काळे, प्रा.एस.पी.विधाते, ग्रंथपाल प्रा. एस पी सुरोशी, एनएसएस अधिकारी प्रा.ए.जी. देखणे तसेच आस्थापना.ओ.एस. एन.एम.बुधवंत, प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आदी उपस्थित होते. वाचन कौशल्य कार्यशाळेसाठी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. अक्षय देखणे यांनी केले.

# चेक न वटल्या प्रकरणी आरोपीस शिक्षा

नगर – फिर्यादी हिरा केशवदास मोत्यानी (प्रो.प्रा. लक्ष्मी डिस्ट्रीब्युटर्स, सावेडी, अ.नगर) यांचे कडून आरोपी डॉ. किशोर नरहरी पाथरकर (कायनेटीक चौक, अ.नगर) यांनी उधारीवर खरेदी केलेल्या औषधाचे (मालाचे) बाकी रक्कम पोटी दिलेला रु. ३,५०,००० चा धनादेश फिर्यादी यास दिला तो न वटता परत आल्याने फिर्यादी यांनी अतिरिक्त न्याय दंडाधिकारी साहेब कोर्ट नं. १५ अ.नगर यांचे कोर्टात निगोशिएबल इंस्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अन्वये फिर्याद दाखल दाखल केलेली होती.

सदर फिर्यादीची गुणदोषावर चौकशी होऊन आरोपीस धनादेश न वटल्या कामी अतिरिक्त न्यायदंडाधिकारी डी. एम. झाटे कोर्ट नं. १५ अ.नगर यांनी आरोपी डॉ. किशोर नरहरी पाथरकर यांना दोषी धरून आरोपी यास रक्कम रुपये ३,८०,००० (अक्षरी रुपये तीन लाख ऐंशी हजार मात्र) चा दंड केला. दंड न भरल्यास ३ महिने कठोर कारावासाची शिक्षा नुकतीच सुनावली आहे. अपीलाचा कालावधी संपताच सदर रक्कम फिर्यादीस देणेचा हुकूम केलेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादीतर्फे ॲड. मनिष पी. गांधी यांनी कामकाज पाहिले.

# सोनम कटारिया सीए उत्तीर्ण

नगर – अखिल भारतीय स्तरावर घेण्यात आलेल्या चार्टर्ड अकाउंटंट परीक्षेत सावेडी उपनगरातील गुलमोहर रोड येथील सोनम कटारीया ही सीए फायनल परीक्षेत उत्तीर्ण झाली आहे. सोनम हिने अत्यंत चिकाटी व मेहनतीने हे यश संपादन केले आहे. नगर येथील सीए अभय भंडारी यांच्याकडे तिने आर्टिकलशिप पूर्ण केली. तिला सीए देसर्डा – भंडारी तसेच सीए रोहित बोरा यांचे मार्गदर्शन लाभले. आव्हाडवाडी येथील चंपालाल कटारिया यांची ती नात असून संजय कटारिया यांची ती कन्या आहे.



# थकबाकीदारांवर छावनी परिषदेची कायदेशीर कारवाई

नगर – छावनी परिषदेची घरपट्टी व पाणीपटटी मिळून रहीवास्याकडून अंदाजे ३.५ करोड रुपये येणे बाकी असल्याने विकास कामे रखडली आहेत. तसेच वसूली होत नसल्याने छावनी परिषदेस मिळणार्या निधीस सुध्दा अडचणी निर्माण होत असल्याने छावनी परिषदेने कडक कारवाईला सुरुवात केलेली आहे. छावनी परिषद क्षेत्रामधील नागरिकांना वारंवार घरपटटी व पाणिपटटी व इतर देय रक्कम छावनी परिषद कार्यालयत जमा करण्याबाबत सुचना देऊनही नागरिकांनी भरणा न केल्याने छावनी परिषदेने कायदेशीर कार्यवाही करण्यास सुरुवात केलेली आहे.

छावनी परिषदेने थकबाकीदारांना वकीलामार्फत नोटीस बजावण्याचे काम हाती घेतले असून त्याच्यावर होणारा खर्च हा मालमत्ताधारकांकडून वसूल करण्यात येत आहे. तसेच वकिलाच्या नोटीस मिळूनही ज्या मालमत्ताधारकांनी त्यांच्यावर देय असलेल्या घरपट्टी पाणिपट्टीचा भरणा न केल्यास छावनी अधिनियमांतग अश्या मालमत्ताधारकांनवर जिल्हा न्यायालयामार्फत वसूलीचा दावा दाखल करुन वसूली करण्यात येत आहे. मागिल महिन्यात भिंगार तसेच सदर बाजार मिळून २० मालमत्ताधारकांवर वसूली दावा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच १५ मालमत्ताधारकांवर वॉरंट बजावून वसूली करण्यात येत आहे. वॉरंट बजावल्यानंतर विहीत मुदतीत देय रक्कम न भरल्यास सदर मालमत्ताधारकांच्या चल संपत्तीची जप्ती करुन लिलावाद्वारे देय रक्कमेची वसूली करण्यात येईल अशी माहीती छावनी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे यांनी दिली.

विक्रांत मोरे यांनी सर्व मालमत्ताधारकांना आवाहन केले आहे की, छावनी परिषदेस देय असलेल्या घरपटटी पाणिपटटी चा भरणा करुन छावनी परिषदेस सहकार्य करावे व कार्यवाहीचा बडगा टाळवा.

# तायक्वांदो स्पर्धेत नगर संघाच्या खेळाडूंनी सहा सुवर्ण पदके पटकावित बाजी मारली

नगर – पोलिस क्रीडा स्पर्धेत तायक्वांदो खेळाच्या स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेचे उद्घाटन राखीव पोलिस निरीक्षक उमेश परदेशी, पोलिस उपनिरीक्षक व्हीक्टर जोसेफ, सहायक पोलिस उपनिरीक्षक शकील शेख यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत अहिल्यानगरच्या खेळाडूंनी बाजी मारली. ३५ व्या नाशिक परिक्षेत्रीय पोलिस क्रीडा स्पर्धेचे आयोजन अहिल्यानगर पोलिस दलातर्फे करण्यात आले. तायक्वांदो स्पर्धेत अहिल्यानगर संघाच्या खेळाडूंनी सहा सुवर्ण पदके पटकावित बाजी मारली, तर धुळे संघाच्या खेळाडूंनी चार सुवर्ण पदके पटकावित दुसरे स्थान पटकाविले आहे. या स्पर्धेतील विजेत्य खेळाडूंची राज्या स्पर्धेसाठी निवड होणार आहे.

तायक्वांदो स्पर्धा पोलिस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलिस अधीक्षक प्रशांत खैरे, राखीव पोलिस निरीक्षक उमेश परदेशी, पोलिस उपनिरीक्षक व्हीक्टर जोसेफ, सहायक पोलिस उपनिरीक्षक शकील शेख, जिल्हा सचिव संतोष बारगजे, सहसचिव अलताफ कडकाले यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आल्या.


पोलिस क्रीडा स्पर्धेत तायक्वांदो खेळाच्या स्पर्धेतील एक क्षण.

या स्पर्धेत पाच जिल्ह्यातील सुमारे ९०० खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. अहिल्यानगर, नाशिक ग्रामीण, नाशिक शहर, जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्याचा समावेश आहे. यामध्ये गुरुवारी (ता.९) तायक्वांदोच्या स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये पाचही जिल्ह्यातील पुरुष व महिला पोलिस खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता. या स्पर्धा पोलिस परेड मैदानावर आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्हा तायक्वांदो असोसिएशनच्या तांत्रिक सहयोगाने पार पडण्यात आल्या. जिल्हा संघटनेच्या पंचांनी ही स्पर्धा उत्साहात पार पाडली. स्पर्धेत जिल्हा संघटनेचे सुरेश वाघ, लक्ष्मण शिंदे, महेश मुरादे, गोरक्षनाथ गालम, रवी यादव, निकीता लखारे, प्रिती सिंग, गणेश धीवर यांनी पंच म्हणून काम पाहिले.

स्पर्धेचा निकाल – पुरुष : सुनील नामदेव घोडके, वैभव सुनील बोराडे, अक्षय बाळू कोतकर, सदाशिव सुरसिंह ठाकरे, विशाल विनायक लिंबे, सौरभ रत्नाकर बागुल, जीवन भास्कर कापडे, सिद्धेश भगवान बडे, महिला : रोहिणी सुभाष सोनवणे, स्वप्ना रमेश गवंजे, किशोरी विनोद देशपांडे, रिना भानुदास शेंडगे, प्रियांका विश्वास राठोड, रत्नमाला राजेंद्र घरटे, दीपाली सोमनाथ सोनवणे, प्रगती मधुकर जाधव, गोदावरी पुंडलीक बागुल, काजल राम वीर, जयश्री सखाराम राऊत, ज्योती शंकर झुगे, नेहा गजानन विभुते, सोनाली बाजीराव काटे, भारती दत्तत्रय केदार, कोमल सुरेश शिंदे, अश्विनी काकासाहेब भोसले, सोनाली विठ्ठल चाटे.

# पंडीत दिनदयाळ पतसंस्थेकडून कर्जाच्या परतफेडीपोटी दिलेला धनादेश न वटल्याच्या खटल्यात आरोपीला दंड व कारावास

नगर – आरोपी उषा दिलीप तरटे, रा.दत्त मेडीकल जवळ, निर्मलनगर, अहमदनगर यांचेवर आरोप सिध्द झाल्यामुळे अहमदनगर येथील १० वे अति. मुख्य न्यायदंडाधिकारी मंदार प्र.पांडे यांनी १८/११/२०२४ रोजी आरोपीस दोषी धरुन तीन महिन्याचा सश्रम कारावास तथा रक्कम रुपये १,५०,००० चा दंड व दंड न भरल्यास एक महिना साध्या कारावासाची शिक्षा व आरोपीस दिलेली आहे. दंडाची रक्कम वसूल झाल्यानंतर दंडाच्या रकमेतून फिर्यादी संस्थेस रक्कम रुपये १,५०,००० नुकसान भरपाई देणेबाबतचा आदेश पारीत केलेला आहे.

खटल्याची थोडक्यात अशी की, आरोपी उषा दिलीप तरटे यांनी पंडीत दिनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था, शाखा अ.नगर यांचेकडे कर्जाची मागणी केलेली होती. त्याप्रमाणे संस्थेने कर्ज मंजूर केलेले होते. आरोपीने सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन दिल्यानंतर आरोपीस कर्जाची रक्कम रुपये ६०,००० अदा केलेली होती.

आरोपीने नियमित कर्ज परतफेड न केल्यामुळे आरोपीचे खाते थकीत झालेले होते. फिर्यादी संस्थेने आरोपीकडे थकीत कर्ज रकमेची मागणी केली असता, आरोपीने त्याचे खाते असलेल्या बँकेवरील रक्कम रुपये १,१०,००० चा धनादेश फिर्यादीस संस्थेस दिलेला होता. परंतू सदरचा धनादेश बँकेत भरला असता, वटला नाही. म्हणून संस्थेने आरोपीस वकीलांमार्फत नोटीस पाठवून रकमेची मागणी केलेली होती. परंतू आरोपीने रक्कम न दिल्यामुळे त्याचेवर धनादेश न वटल्यामुळे संस्थेने आरोपी विरुध्द फौजदारी खटला दाखल केलेला होता. सदरच्या खटल्याची सुनावणी होऊन वरील प्रमाणे न्याय निर्णय दिलेला आहे.

सदर खटल्यामध्ये संस्थेचे वतीने ॲड. राजीव व्ही. शितोळे यांनी काम पाहिले.

तसेच फिर्यादी म्हणून गणेश संभाजी जंगम यांनी काम पाहिले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# निरामय

## प्रथिनांसह कर्बोदकंही हवी

आहारतंत्र

वजन कमी करण्यासाठी प्रथिनयुक्त पदार्थ खाण्याचा सल्ला दिला जातो. या प्रक्रियेत कर्बोदकांचं प्रमाण कमी केलं जातं. मात्र कर्बोदकांमुळे शरीराला ऊर्जा मिळत असल्याने प्रथिनं आणि कर्बोदकांचा समतोल साधला जाणं गरजेचं आहे. प्रथिनांसोबतच कर्बोदकांच्या सेवनाने वजन कमी होण्यास मदत होते. प्रथिनं आणि कर्बोदकांचा समतोल कसा साधायचा, याविषयी...

* चिकनमध्ये भरपूर प्रथिनं असतात. चिकन उकडून, भाजून किंवा ग्रील करून खाता येतं. चिकन शिजवताना लाल तिखट घातल्याने शरीराला कर्बोदकं मिळू शकतील. १०० ग्रॅम लाल तिखटात ५० ग्रॅम कर्बोदकं आणि ३५ ग्रॅम डाएटरी फायबर असतं. यामुळे प्रथिनं आणि कर्बोदकं यांचा समतोल साधता येतो.



* कर्बोदकं आणि क जीवनसत्त्वाने समृद्ध भोपळी मिरची आणि प्रथिनयुक्त अंडं यांचं एकत्रित सेवन करता येईल. अंड्यामुळे चयापचय क्रिया सुधारते तर भोपळी मिरची चरबी कमी करण्याचं काम करते. जेवणात आमटी आणि पोळी खाता येईल. ओटमील, पेरु आणि कठीण कवचाची फळं एकत्र खाता येतील.

## देशातील ५५ टक्के लोकांना प्रदूषणाचा फटका

आरोग्यवेध

देशात सध्या प्रदूषणाचा प्रकोप प्रचंड वाढला आहे. त्यामुळे नागरिकांना विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे. या भयंकर प्रदूषणामुळे देशातील अर्ध्याहून अधिक लोकांना घसा, नाक आणि कानाची समस्या उद्भवली आहे. एका अहवालात याबाबत गौप्यस्फोट करण्यात आला आहे. देशातील प्रदूषणावर एक संशोधन करण्यात आले. त्यात देशातील ५५ टक्के लोक नाक, कान आणि घशाच्या आजाराने ग्रासलेले असल्याचं आढळून आले आहे. देशातील काही महत्त्वाच्या शहरात अभ्यास करण्यात आला. त्यातून ही आकडेवारी आली आहे. 'प्रिस्टिन केअर' नावाच्या आरोग्य संस्थेने हे सर्वेक्षण केले. दिल्ली, मेरठ, फरिदाबाद, नोएडा, गाझियाबाद, रोहतक, चंदीगड, कानपूर आदी शहरात ५६ हजार६ ७६ लोकांवर आधारित हे संशोधन केले गेले. यातून प्रदूषणामुळे ४१ टक्के लोकांना नेत्रविकार असल्याचे आढळून आले आहे. डोळ्यात पाणी येणे आणि डोळ्यात जळजळ होणे या समस्या या लोकांना जाणवत आहेत.



*** मास्क घालूनच फिरा**

हवेचे वाढते प्रदूषण ही चिंतेची गोष्ट आहे. प्रदूषणामुळे सर्वाधिक फटका लहान मुलांना बसत आहे. प्रदूषित हवा नाक आणि कानाच्या संवेदनशील श्लेष्मा आवरणात त्रास निर्माण करू शकते. त्यामुळे नाक आणि कानांच्या अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. अनेक भागात प्रदूषण अजूनही अत्यंत जास्त आहे. त्यामुळे लोकांनी त्यांच्या आरोग्याची काळजी घेऊन मास्क घालणे अत्यंत आवश्यक आहे,

*** डोळे जपा**


प्रदूषणाचा परिणाम फक्त नाक आणि कानांवरच नाही, तर डोळ्यांवरदेखील झाला आहे. अनेक लोकांना डोळ्यांत जळजळ होणे, पाणी येणे, डोळे लाल होणे, चुरचुरणे अशा समस्या जाणवू लागल्या आहेत. त्यामुळे सर्वांनीच डोळ्यांच्या आरोग्यालाही विशेष महत्व दिले पाहिजे. प्रदूषण आणि त्याच्या परिणामांनी आरोग्यावर होणारा हानीकारक प्रभाव सहज लक्षात घेतला पाहिजे, असा सल्लाही तज्ज्ञ देत आहेत.

*** गरोदर महिलांनी काळजी घ्या**

डोळे, कान, नाक आणि घशाचा त्रास होत असेल तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या. या बाबतीत बेसावध राहणे धोक्याचे ठरू शकते. प्रदूषणामुळे लोक त्रस्त आहेत. वृद्ध व्यक्ती, मुले आणि गरोदर महिलांना यापासून संरक्षणासाठी विशेष काळजी घ्यावी लागेल. ज्यांची रोग प्रतिकारक शक्ती कमी आहे, त्यांना प्रदूषणाचा धोका अधिक आहे. म्हणूनच प्रदूषणापासून वाचण्यासाठी काळजी घ्या. बाहेर पडताना पूर्ण खबरदारी घ्या. नाक, कान, घशाचा संसर्ग असलेल्यांच्या संपर्कात येऊ नका.

## कर्करोगाच्या उपचारात नवीन शोध उपयुक्त

भारतातील प्रमुख संशोधन संस्था 'एम्स' (ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस) च्या शास्त्रज्ञांनी एक मोठा शोध लावला आहे. तो कॅन्सरच्या उपचारात आणि निदानासाठी उपयुक्त ठरू शकते. हे संशोधन 'एम्स'च्या बायोकेमिस्ट्री विभागाचे डॉ. शुभदीप कुंडू (पीएच. डी संशोधक) यांनी डॉ. अशोक शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली केले आहे. हे संशोधन मॅमॅलियन जीनोम (स्प्रिंगर नेचर पब्लिकेशन) मध्ये प्रकाशित करण्यात आले आहे.



या अभ्यासात असे आढळून आले आहे, की बी–प्रकारचे लॅमिन्स, विशेषत: लॅमिन बी१ आणि लॅमिन बी२, कर्करोगाच्या प्रगतीवर आणि रुग्णांच्या जगण्याच्या शक्यतांवर खोल परिणाम करतात. 'लॅमिन्स' हे प्रथिने आहेत, ते पेशीच्या केंद्रकांना स्थिरता प्रदान करतात. 'एम्स'च्या शास्त्रज्ञांनी, विविध प्रकारच्या कर्करोगात 'आरएनए सिक्वेन्सिंग' तंत्रज्ञानाचा वापर करून असे निरीक्षण केले, की लॅमिन बी१ आणि लॅमीन बी२ चे उच्च पातळीचे उत्पादन कर्करोगाच्या रुग्णांना धोका निर्माण करू शकते. ज्या रुग्णांमध्ये लॅमिन बी १ आणि लॅमीन बी२ दोन्हीचे प्रमाण जास्त होते, त्यांचे आयुष्य लक्षणीयरीत्या कमी असल्याचे आढळून आले. जेव्हा हे दोन लॅमिनिन मोठ्या प्रमाणात एकत्रितपणे तयार होतात, तेव्हा कर्करोग अधिक घातक होण्याची शक्यता वाढते.

संशोधनात असेही समोर आले आहे, की लॅमिन बी १ आणि लॅमीन बी २ कर्करोगाच्या ट्यूमर सूक्ष्म वातावरणाशी संबंधित आहेत. लॅमिन बी१ थेट सीडी+ टी–सेल्स आणि टाइप–२ टी–हेल्पर सेल्स (टीएच२) शी संबंधित आहे. हे सूचित करते, की ते रोगप्रतिकारक पेशींच्या सहभागावर आणि कर्करोगाच्या प्रतिसादावर परिणाम करू शकतात. लॅमिन बी २ देखील काही प्रमाणात या रोगप्रतिकारक पेशींशी संबंधित असल्याचे आढळले; परंतु त्याचा प्रभाव लॅमिन बी १ पेक्षा कमी होता.

*** नऊ प्रोटिन्सची ओळख**

संशोधकांनी कॅन्सरमध्ये लॅमिन बी २ शी संबंधित नऊ प्रोटीन्स ओळखले आहेत, जे सेल डिव्हिजन आणि साइटोकिनेसिसवर परिणाम करतात. या शोधाने हे स्पष्ट केले आहे, की बी–टाइप लॅमिन्स केवळ कर्करोगाच्या वाढीसाठी जबाबदार नाहीत, तर ते बायोमार्कर म्हणूनदेखील वापरले जाऊ शकतात जे रुग्णाची स्थिती किती गंभीर आहे हे दर्शवतात.

*** बी–टाइप लॅमिन्स कॅन्सरच्या उपचारात उपयुक्त**

बी–टाइप लॅमिन्स कर्करोगाच्या उपचारात नवीन लक्ष्य म्हणून काम करू शकतात. लॅमिनिनवर आधारित औषधे आणि थेरपी विकसित करणे ही एक महत्त्वाची पायरी असू शकते. जर या प्रथिनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पद्धती विकसित केल्या गेल्या, तर ते कर्करोगाच्या रुग्णांना चांगले उपचार देऊ शकतात. हा शोध कर्करोग रुग्ण आणि वैद्यकीय समुदाय दोघांसाठी आशेचा किरण आहे. जर लॅमिनिन्सची भूमिका अधिक चांगल्या प्रकारे समजून घेता आली, तर कर्करोगाचे निदान आणि उपचारांसाठी ते 'गेम चेंजर' ठरू शकते.

## का असतात सहा बोटं?

वेगळं काही

माणसाच्या दोन्ही हातांना मिळून दहा बोटं असतात. मात्र काहींच्या एका हाताला किंवा पायाला एखादं जास्तीचं बोट असतं. तुमच्याही संपर्कात अशी काही माणसं आली असतील. हात किंवा पायाला सहा बोटं असणं हा दैवी चमत्कार मानला जातो. पण खरंच असं असतं का? असा दैवी चमत्कार मोजक्याच लोकांच्या बाबतीत का घडतो, हा विचार कधी तुमच्या मनाला शिवला आहे का? खरं पाहता सहावं बोट हा कोणताही दैवी चमत्कार नाही तर तो एक विकार आहे. त्याला पॉलिडॅक्टिली असं म्हटलं जातं. ही व्याधी जडलेल्या माणसांना जन्मजात एक किंवा दोन अतिरिक्त बोटं असतात. हे अतिरिक्त बोट एका किंवा दोन्ही हातांना अथवा पायांना असू शकतं.

पॉलिडॅक्टिली हा अनुवंशिक विकार आहे. त्यामुळे एकाच कुटुंबातल्या अनेकांना ही समस्या असू शकते. हा विकार पुढच्या पिढ्यांमध्येही दिसून येतो. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होणाऱ्या या विकाराला फॅमिलियल पॉलिडॅक्टिली असं म्हटलं जातं. पॉलिडॅक्टिली अनुवंशिक नसेल तर आईच्या गर्भात असताना बाळाच्या जनुकांमध्ये होणारे बदल याला कारणीभूत ठरतात.

व्याधीच्या प्रकारावरून त्यावरच्या उपायांची दिशा ठरते. अनेकदा बोटांच्या जागी एखादा मांसल भाग दिसतो. या भागाला हाड नसतं. यामुळे रुग्णाला फारसा त्रास होत नाही. त्याच्या दैनंदिन आयुष्यावरही याचा परिणाम होत नाही. त्यामुळे यावर उपचार घेण्याची गरज नसते. मात्र हा भाग फार विचित्र दिसत असेल तर काही उपचार घेता येतात. हाड नसलेलं बोट पटकन काढता येतं. मात्र पूर्ण वाढ झालेलं किंवा वापरात असणारं अतिरिक्त बोट काढण्यासाठी शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेणं योग्य ठरतं. अर्थातच हे बोट काढावं की नाही याचा निर्णय सर्वस्वी तज्ज्ञांचा असतो. तपासणीअंती ते हा निर्णय घेतात.



अतिरिक्त अंगठ्यावरचे उपचार काहीसे गुंतागुंतीचे ठरू शकतात. यामुळे मूळ अंगठ्याच्या कार्यावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे ही शस्त्रक्रिया अत्यंत काळजीपूर्वक करावी लागते. सेंट्रल पॉलिडॅक्टिली या प्रकारात मधल्या, पहिल्या किंवा अनामिकेलाच अतिरिक्त बोट जोडलेलं असतं. अशा परिस्थितीत डॉक्टर अतिरिक्त बोट कायम ठेवतात. मात्र दुष्परिणाम टाळण्यासाठी लिगामेंट्स आणि स्नायूबंध काढून टाकले जातात. इतकंच नाही, तर शस्त्रक्रियेद्वारे दोन्ही बोटं काढून त्या जागी नवं बोटही बसवलं जातं. इतर काही जनुकीय कारणांमुळे पॉलिडिक्टिलीची समस्या उद्भवली असेल तर रुग्णाला इतर वैद्यकीय उपचारांची गरज पडू शकते. त्यामुळे हात किंवा पायाला असणाऱ्या अतिरिक्त बोटाकडे फक्त दैवी चमत्कार म्हणून बघू नये. हा एक विकार आहे. त्यामुळे ही समस्या असणाऱ्यांनी त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणं गरजेचं आहे.

## धोका स्टॅटिन्सचा

नवसंशोधन

कोलेस्टेरॉलचं प्रमाण कमी करणारी औषधं म्हणजेच स्टॅटिन्स घेणाऱ्यांना टाईप २ मधुमेह होण्याचा धोका दुपटीने वाढतो, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. स्टॅटिन्स या औषधांच्या प्रकारामुळे रक्तातलं कोलेस्टेरॉल कमी होतं तसंच उच्च रक्तदाबावरही नियंत्रण मिळवता येतं. या औषधांमुळे हृदयविकार आणि स्ट्रोकचा धोकाही कमी होत असल्याने अनेकांची स्टॅटिन्सला पसंती असते. त्यामुळे संशोधकांनी स्टॅटिन्सच्या परिणामांचा अभ्यास केला. तेव्हा ही औषधं घेणाऱ्यांना ती न घेणाऱ्यांच्या तुलनेत मधुमेह होण्याचा धोका दुपटीने अधिक असल्याची बाब समोर आली. कोलेस्टरॉल कमी करणारी ही औषधं दोन वर्षांपेक्षा अधिक काळ घेणाऱ्यांमध्ये मधुमेहाचा धोका तिपटीने वाढण्याची शक्यता असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.




## टूथपेस्टमुळे ऑस्टिओपॉरॉसिस?

दंतारोग्य


टूथपेस्टसह साबण आणि विविध प्रकारच्या क्रीम्समध्ये वापरल्या जाणाऱ्या ट्रायक्लोसॅन नामक रसायनामुळे ऑस्टिओपॉरॉसिसचा धोका वाढू शकतो, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. त्यातही महिलांना हा धोका अधिक प्रमाणात असतो, असंही हे संशोधन सांगत. टूथपेस्टमध्ये हे रसायन असू शकतं. यासोबतच शरीराच्या स्वच्छतेसाठी वापरल्या जाणाऱ्या उत्पादनांमध्येही ते असतं. ट्रायक्लोसॅन आणि हाडांचं आरोग्य यांचा संबंध तपासण्यासाठी १८४८ महिलांचा अभ्यास करण्यात आला.




## टाकून द्या या वस्तू

आपण कुठे चुकतो?

एखाद्या विकाराचा उगम आपल्या घरातूनच होऊ शकतो. वापरात असणाऱ्या असंख्य वस्तूंमधली रसायनं विविध व्याधींना आमंत्रण देतात तर काही वस्तू ताण वाढवणाऱ्या ठरु शकतात. इच्छा असूनही आपण काही वस्तू टाकून देणं टाळत रहातो. घरातल्या कोणत्या वस्तू हानिकारक ठरतात हे जाणून घेऊ या.



* प्लास्टिकच्या दुष्परिणामांबद्दल आपण बरंच काही वाचतो, ऐकतो. पण वापरायला सुलभ आणि वजनानं हलकं प्लास्टिक वापरातून लवकर बाद होत नाही. मात्र पीसी ही अक्षरं छापलेले प्लास्टिकचे डबे खूप घातक असतात हे जाणून घ्यायला हवं. पीसी म्हणजे पॉलिकार्बोनेट. यात बिल्फेनॉल नामक रसायन असू शकतं. हे रसायन शरीरात गेल्याने श्वसनविकार, हृदयविकार, उच्च रक्तदाब यासारख्या समस्या निर्माण होतात.

* एअर फ्रेशनर्समधली रसायनं आरोग्यासाठी हानिकारक ठरतात. म्हणूनच फ्रेशनर्सचा वापर टाळावा.

* जुने, खराब झालेले टूथब्रश घरात ठेऊ नका. या ब्रशवर बॅक्टेरियांचा वास असतो. यामुळे रोगांना निमंत्रण मिळतं.

* जुने, घट्ट होणारे कपडे तुमचा ताण वाढवतात. त्यामुळे असे कपडे देऊन टाका.

## तुळस आहे गुणकारी

आयुर्वेद आणि विकार

हिंदू धर्मात तुळशीचं महत्त्व आहेच शिवाय आयुर्वेदानुसारही ही अत्यंत गुणकारी अशी औषधी वनस्पती आहे. म्हणूनच विविध विकारांवर उपचार करताना तुळशीची पूड वापरली जाते. हृदयविकार, कीटकदंश, ताप, श्वसनाचे विकार, त्वचाविकार अशा असंख्य व्याधींवर तुळस गुणकारी ठरते. तुळशीच्या औषधी गुणधर्मांविषयी...



* तुळशीत जीवाणू, विषाणू तसंच रोगांना कारणीभूत ठरणाऱ्या विविध जंतूंचा नाश करणारे गुणधर्म असतात. तापाला कारणीभूत ठरणाऱ्या जंतूसंसर्गाचा प्रभाव कमी करण्याची क्षमता तुळशीत असल्याने ताप तसंच सर्दी, खोकल्यावर हा रामबाण उपाय ठरू शकतो.

* तुळशीतल्या औषधी तेलांमुळे स्वादुपिंडाचं कार्य सुरळीत सुरू राहण्यास मदत होते. यामुळे इन्शुलिनची निर्मिती योग्य प्रमाणात होऊन मधुमेहाला आळा घालता येतो. तुळशीच्या सेवनाने रक्तातली साखर नियंत्रणात ठेवता येते.


* तुळस शरीरातल्या युरिक ॲसिडची पातळी कमी करते. तुळशीतल्या औषधी घटकांमुळे मूत्रमार्गातले खडे विरघळू शकतात.

* तुळशीमुळे रोगप्रतिकारकशक्ती वाढते. सर्दी–खोकल्यासा त्रास कमी होतो. दाह कमी करण्याच्या क्षमतेमुळे श्वसनाच्या विकारांना आळा घालता येतो.

## 'मॅक्युलर डिजनरेशन'विषयी...

डोळ्यांचं आरोग्य

'मॅक्युलर डिजनरेशन' हा प्रौढांना होणारा नेत्रविकार आहे. कोरडा आणि ओला असे याचे दोन प्रकार आहेत. हा विकार पूर्णपणे बरा होऊ शकत नसला तरी भविष्यातलं डोळ्यांचं नुकसान टाळता येतं. योग्य औषधोपचारांनी रुग्ण सर्वसामान्य जीवन जगू शकतो. या विकाराला प्रतिबंध करण्यासाठी धूम्रपान सोडायला हवं. डोळ्यांची नियमित तपासणी करणंही गरजेचं आहे. डोळ्यांवर मधुमेहासारख्या विकाराचा विपरीत परिणाम होतो. त्यामुळे मधुमेह नियंत्रणाचे उपाय करणंही गरजेचं आहे. हा विकार प्रौढांना होत असला तरी तरुणांनीही योग्य ती खबरदारी घ्यायला हवी.



## ल्युकेमियाची लक्षणं

व्याधी विचार

ल्युकेमिया म्हणजे रक्तपेशी किंवा बोन मॅरोचा कर्करोग. याला रक्ताचा कर्करोग असंही म्हटलं जातं. शरीरातल्या पांढऱ्या रक्तपेशींच्या निर्मितीतले अडथळे या विकाराला कारणीभूत ठरतात. भारतात दर वर्षी जवळपास एक दशलक्ष लोकांना रक्ताच्या कर्करोगाचं निदान होतं. कॅन्सरग्रस्त रक्तपेशींवरून रक्ताच्या कर्करोगाचा प्रकार ठरतो. प्राथमिक टप्प्यात या विकाराचं निदान झालं तर रूग्ण वाचण्याची शक्यता असते. म्हणूनच या विकाराची लक्षणं जाणून घेणं गरजेचं आहे.

फारसे शारीरिक श्रम न करता थकवा येत असेल तर रक्ताची तपासणी करायला हवी. वारंवार येणारा थकवा शरीरातल्या लाल रक्तपेशींच्या कमतरतेकडे अंगुलीनिर्देश करतो. ॲनिमियामुळेही असं होऊ शकतं. मात्र लाल रक्तपेशींची कमतरता रक्ताच्या कर्करोगाला निमंत्रण देऊ शकते.

एकसारखी धाप लागणं हे ल्युकेमियाचं लक्षण असू शकतं. श्रमामुळे शरीर अशक्त होऊ शकतं. परिणामी, धाप लागू शकते. यामुळे चार जिने चढणंही कठीण होऊन बसतं. जिने चढल्यानंतर प्रचंड दमणूक होते.



कोणत्याही दुखापतीशिवाय जखम होत असेल किंवा शरीराचा एखादा भाग काळानिळा पडत असेल तर आरोग्य तपासणी करून घ्यायला हवी कारण हे ल्युकेमियाचं लक्षण असू शकतं. प्लेटलेट्स कमी होणं, रक्त साकळणं अशा कारणांमुळे ही समस्या निर्माण होते. शरीराच्या विविध भागांवर काळपट–निळसर डाग दिसतात. त्यातही पाय आणि हातांवर ते अधिक प्रमाणात दिसून येतात.

प्रत्येक वेळी तोंडाच्या अस्वच्छतेमुळेच हिरड्या सुजतात असं नाही तर हे तोंडाच्या कर्करोगाचं लक्षणही असू शकतं. हिरड्यांचा आकार वाढण्याच्या त्रासाला शास्त्रीय भाषेत गिंगायव्हल हायपरप्लेसिया असं म्हणतात. ल्युकेमियामुळे ही समस्या निर्माण होते.

वरचेवर येणारा ताप हे जंतूसंसर्ग आणि रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्याचं लक्षण असतं. रक्ताच्या कर्करोगमुळे असं होऊ शकतं.

झोपेत घाम येणं ही सुद्धा सर्वसाधारण बाब नाही. वारंवार उद्भवणारी डोकेदुखी रक्ताच्या कर्करोगाचं किंवा डोक्यातल्या रक्तस्रावाचं लक्षण असू शकते.

## लाभ दुधाचे

आजीबाईचा बटवा

दूध आरोग्यासाठी लाभदायी असतं. यातले नऊ पोषक घटक विविध आजारांपासून आपला बचाव करतात. दुधात कॅल्शियम आणि प्रथिनांसह पोटॅशियम, फॉस्फरस, ड, बी १२, अ आणि बी २ ही जीवनसत्त्वं आणि नियासिन असतं. कॅल्शियममुळे हाडं आणि दात बळकट होतात. प्रथिनांमुळे स्नायूंना शक्ती मिळते. पोटॅशियममुळे रक्तदाबावर नियंत्रण मिळवता येतं. शरीराला फॉस्फरसचीही गरज असते. बी २ हे जीवनसत्त्व अन्नाचं रूपांतर ऊर्जेत करायला मदत करतं तर नियासिनमुळे चयापचय क्रिया सुधारते. अ जीवनसत्त्व डोळ्यांच्या आरोग्यासाठी गरजेचं असतं. त्यामुळे पोषणमूल्यांचा स्रोत असणारं दूध दररोज प्यायला हवं.



# जनतेच्या शासनाकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी काम करा

## जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांचे प्रतिपादन; जिल्ह्यात 'मिशन १०० दिवस' ७ कलमी कार्यक्रमास सुरुवात

नगर – लोकांच्या शासनाकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक राहून मिशन १०० दिवस उपक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिल्या. या उपक्रमांतर्गत नागरिकांच्या सोयीसुविधा, प्रशासनातील सुधारणा आणि उद्योजकांना गुंतवणूकीसाठी प्रोत्साहन यावर भर दिला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची संकल्पना असलेल्या ७ कलमी कार्यक्रमांची 'मिशन १०० दिवस' अंतर्गत अंमलबजावणीसाठी पूर्वतयारीचा जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी आढावा घेतला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची संकल्पना असलेल्या ७ कलमी कार्यक्रमांची 'मिशन १०० दिवस' अंतर्गत अंमलबजावणीसाठी पूर्वतयारीचा आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील, उपजिल्हाधिकारी अतुल चोरमारे आदी उपस्थित होते.

सर्व विभागप्रमुखांनी सात मुद्द्यांवर काम करण्याबाबतच्या सूचना देताना जिल्हाधिकारी श्री.सालीमठ म्हणाले, प्रत्येक विभागाने आपल्या संकेतस्थळावरील माहिती अद्ययावत करावी, जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळ अधिक माहितीपूर्ण आणि नागरिकांसाठी उपयुक्त करण्यावर भर द्यावा. नागरिकांना ऑनलाइन सुविधांचा जलद लाभ घेता यावा, यासाठी संकेतस्थळ नसलेल्या विभागांनी अद्ययावत संकेतस्थळांची निर्मिती करावी. 'इज ऑफ लिव्हिंग' या संकल्पनेवर नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी करण्यासाठी विविध सेवांचे सुसूत्रीकरण व सरळीकरण करण्यात यावे. 'सुंदर माझे कार्यालय' या संकल्पनेअंतर्गत शासकीय विभागातील प्रत्येक कार्यालय स्वच्छ, सुटसुटीत, आणि कार्यक्षम ठेवण्यासाठी स्वच्छता मोहीम राबवावी, यासाठी कार्यालयीन अभिलेख अद्ययावत करण्यात यावे. अनावश्यक साहित्य निर्लेखित करण्यात यावे.

नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी तक्रार निवारण यंत्रणा अधिक प्रभावी करण्यावर भर द्यावा, यासाठी ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही पद्धतींचा वापर करावा. नागरिकांच्या तक्रारी व अर्जांवर सात दिवसांच्या आत निराकरण करण्यात यावे, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या.

कार्यालयात नागरी सुविधा पुरविण्यात याव्यात, यामध्ये शासकीय कार्यालयामध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा, कार्यालयातील स्वच्छतागृहे स्वच्छ ठेवणे, अभ्यागत कक्ष निर्माण करावा, कार्यालयाची रंगरंगोटी व सुशोभीकरण यावर भर देण्यात यावा. अधिकाऱ्यांनी जिल्ह्याच्या विविध भागांना भेट देऊन प्रत्यक्ष अंमलबजावणीवर लक्ष ठेवावे, दोन दिवस क्षेत्रीय भेटीसाठी राखून ठेवावा, तसेच क्षेत्रीय भेटीमध्ये शासनाच्या महत्त्वकांक्षी व पथदर्शी योजनांचा आढावा घेण्यात यावा, अशा सूचना ही त्यांनी दिल्या.

जिल्ह्यात गुंतवणूक वाढविण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तातडीने सर्व परवाने संबंधितांना उपलब्ध करून देण्यात येतील. उद्योजकांची कुठेही अडवणूक होणार नाही, यासाठी दक्ष राहण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

अहिल्यानगर जिल्हा ई-ऑफिस प्रणाली राबविण्यात राज्यात प्रथम क्रमांकावर आहे. यापुढे आपला जिल्हा सर्व विभागात ई ऑफिसची अंमलबजावणी करणारा प्रथम जिल्हा ठरला पाहिजे, यासाठी सर्व विभागांनी काम करावे, अशा सूचना ही त्यांनी दिल्या. सात कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा दर मंगळवारी ऑनलाईन आढावा घेतला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत क्रीडा स्पर्धांचे उद्‌घाटन करताना प्रा.डॉ.अब्दुस सलाम, आबीद दूलेखान, नौशाद सय्यद, असलम पटेल सर आदी.

# सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत क्रीडा स्पर्धांचे उद्‌घाटन

नगर – संस्कृतीला चालना देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये खेळासाठी उत्साहवर्धक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने दरवर्षी शाळेत क्रीडा स्पर्धा आयोजित केले जातात, असे प्रतिपादन मोहम्मदीया एज्युकेशन अ‍ॅण्ड वेल्फेअर सोसायटीचे संस्थापक व प्रमुख कार्यवाह डॉ.प्रा. अब्दुस सलाम सर यांनी केले.

सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत क्रीडा स्पर्धांचे उद्‌घाटन प्रा.डॉ.अब्दुस सलाम, मखदूम एज्युकेशन अ‍ॅण्ड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूलेखान, मुख्याध्यापक नौशाद सय्यद, असलम पटेल सर यांच्या हस्ते फुगे सोडुन करण्यात आले.

याप्रसंगी यास्मिन शेख, फरजाना शेख, शाहीन शेख, काझी मुमताज, शेख सुलताना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे मुख्याध्यापक नौशाद सैय्यद यांनी पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. प्रास्ताविकात असलम पटेल यांनी आयोजित केल्या जाणाऱ्या विविध क्रीडा स्पर्धा आणि उपक्रमांबद्दल सांगितले. यावेळी खेळाडूंना देण्यात येणाऱ्या सुविधांबद्दल आबीद दुलेखान यांनी आपले मत व्यक्त करताना म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या जीवनात खेळांची अमूल्य भूमिका असते.जर आपल्याला खेळात जास्तीत जास्त प्रगती करायची असेल तर खेळाडूने स्वतःला पूर्णपणे समर्पित केले पाहिजे. त्यासाठी कठोर परिश्रम करण्याची तयारी ठेवावी, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख सुलताना यांनी केले. तर आभार शाहीन शेख यांनी मानले. शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कठोर परिश्रम घेतले.

# श्री मार्कंडेय मॉर्निंग ग्रुपच्या अध्यक्षपदी राजेंद्र कर्नावट



नगर – येथील श्री मार्कंडेय मॉर्निंग ग्रुप सिद्धीबाग यांची सर्वसारधण सभा नुकतीच खेळीमेळीच्या वातावरणात झाली. कै. विठ्ठलराव मंगलारम यांना अभिवादन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. मावळते अध्यक्ष दत्तात्रय जोग यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी अध्यक्ष निवडीची सूचना रघुनाथ गजेंगी यांनी मांडली. रमेश बोगा यांनी राजेंद्र कर्नावट यांची श्री मार्कंडेय ग्रुपचे नूतन अध्यक्ष म्हणून अनुमोदन दिले. सर्वानुमते राजेंद्र कर्नावट यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली तर सल्लागार म्हणून विठ्ठलराव गुंडू व उपाध्यक्ष पदी सुभाष श्रीपत व ज्ञानेश्वर मंगलारम यांची तर सचिवपदी रमेश भुसा व खजिनदारपदी रविंद्र बेती यांची निवड करण्यात आली.

या सभेत कृष्णा संभार, शंकर नक्का, कुमार आडेप, शेखर दिकोंडा यांनी सूचना मांडल्या. विनायक बत्तीन यांनी आभार मानले.

याप्रसंगी श्री मार्कंडेय ग्रुपचे सदस्य उपस्थित होत.

# साईबन कृषी पर्यटन केंद्रात आठरे पाटील स्कूलच्या विद्यार्थ्यांची सहल

नगर – सध्या शिर्डी रोडवरील नागापूर एम आयडीसीच्या मागे साईबनमध्ये नुकतीच सावेडीतील आठरे पाटील पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांची सहल गेली होती.

शाळेकडून शैक्षणिक दृष्टीने महत्त्वाच्या ठिकाणी एकाच दिवसाची सहल नेली जायची. या शैक्षणिक सहली म्हणजे एक शालेय उपक्रमच होय. पूर्वी शालेय संस्था या फक्त शैक्षणिक दृष्टीने महत्वाचे असणाऱ्या स्थळांना, विद्यार्थ्यांना घेऊन जायचे जसे की, वैज्ञानिक अभ्यास केंद्रे, वाचनालये, परंतु आता ऐतिहासिक स्थळे, प्रेक्षणिय स्थळे, गडकिल्ले, समुद्रकिनारे, विविध संग्रहालये, कारखाने अशा विविध स्थळांवर नेल्या जातात. सध्या हा ट्रेंड सुद्धा बदलताना दिसत आहे.




एमआयडीसीच्या मागे साईबनमध्ये सावेडीतील आठरे पाटील पब्लिक स्कूलचे विद्यार्थी दिसत आहेत.

महाविद्यालयांच्या धर्तीवर शाळांच्या सहली वॉटर पार्क, समुद्रकिनारी अशा ठिकाणी काढल्या जातात, हा बदलता ट्रेंड पर्यटनवाढीसाठी उपयुक्त ठरत आहे अशा शैक्षणिक सहली काढण्यामागे शालेय संस्थेचा एकच उद्देश असतो, तो म्हणजे मुलांच्या अभ्यासात आणि बुद्धीत आणखी भर पाडणे. म्हणून नगर, पुणे, औरंगाबाद, बीड, मराठवाडा, नाशिक, ठाणे जिल्हातील शाळेच्या सहली दरवर्षी मोठ्या प्रमाणात साईबनला येतात.

# महापालिकेच्या जन्म-मृत्यू विभागाच्या कामाचा आढावा घेत आरोग्याधिकाऱ्यांनी केली आरोग्यवर्धिनी केंद्रांची तपासणी

## नागरिकांना सुरळीत सेवा मिळेल यादृष्टीने उपाययोजना कराव्यात : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांचे आदेश

नगर – महानगरपालिकेच्या सर्व आरोग्य केंद्रांमध्ये, नव्याने करण्यात आलेल्या आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये व जन्म मृत्यू विभागात नागरिकांना आवश्यक सेवा व सुविधा सुरळीतपणे उपलब्ध राहतील, या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे आदेश आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिले होते. त्यानुसार प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांनी कार्यभार स्वीकारताच आरोग्यवर्धिनी केंद्रासह जन्म व मृत्यू विभागात भेटी देऊन आढावा घेतला.



कार्यभार स्वीकारताच डॉ. सतीश राजूरकर यांनी जन्म मृत्यू विभागाच्या कामाची झडती घेतली.

आयुक्त यशवंत डांगे यांनी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे यांना सक्तीच्या रजेवर पाठवले आहे. त्यांच्या पदाचा कार्यभार डॉ. राजूरकर यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. शासनाकडून आरोग्य विभागाच्या कामांचे, सेवांचे मूल्यमापन करून रँकिंग दिले जाते. यात महानगरपालिकेचा शेवटच्या पाच महानगरपालिकेत समावेश झाला आहे. त्यामुळे आरोग्य विभागाच्या कामात व सेवांमध्ये सुधारणा होण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आदेश आयुक्त यशवंत डांगे यांनी डॉ. राजूरकर यांना दिले आहेत.

त्यानुसार डॉ. सतीश राजूरकर यांनी कार्यभार स्वीकारताच आरोग्य केंद्रे, आरोग्यवर्धिनी केंद्रे व जन्म व मृत्यू विभागात भेटी देऊन झडती घेतली. नागरिकांना वेळेत दाखले देता येतील, अशा पद्धतीने कामाचे नियोजन करावे. दाखल्यांसाठी नागरीकांना वारंवार हेलपाटे मारावे लागणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. नागरिकांना वेळेत दाखले मिळावेत, यासाठी आयुक्त यशवंत डांगे यांनी प्रत्येक प्रभाग समिती कार्यालयात सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यानुसार सुरळीत कामकाज राहील, असे नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

शहरात १८ आरोग्यवर्धीनी केंद्र मंजूर असून त्यातील १२ कार्यरत करण्यात आले आहेत. या केंद्रांमध्ये डॉक्टर व इतर कर्मचारी वेळेत उपस्थित असावेत. आवश्यक औषध साठा व इतर आवश्यक सामग्री उपलब्ध ठेवावी. नागरिकांना चांगल्या दर्जाची आरोग्य सेवा दिली जाईल, यादृष्टीने उपाययोजना करून कामकाज करावे, असे डॉ. राजूरकर यांनी सांगितले. दरम्यान, डॉ. राजूरकर यांनी आरोग्य केंद्रात व जन्म मृत्यू विभागात कर्मचाऱ्यांना काम करताना येणाऱ्या अडचणींचीही माहिती घेतली.



पेमराज सारडा महाविद्यालयाच्या उपप्राचार्य पदी नियुक्ती झाल्याबद्दल प्रा. गिरीश पाखरे यांचा सत्कार करताना प्रा.शिरीष मोडक आदी.

# सारडा महाविद्यालयाच्या उपप्राचार्यपदी प्रा. गिरीश पाखरे

नगर – हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालयाच्या उपप्राचार्य पदी प्रा.गिरीश पाखरे यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना पर्यवेक्षक पदावरून पदोन्नती देण्यात आली आहे. मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी व कार्याध्यक्ष अ‍ॅड. अनंत फडणीस यांनी प्रा.पाखरे यांचा सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, प्रबंधक अशोक असेरी, माजी उपप्राचार्य मंगला भोसले, पर्यावेक्षक राजू रिक्कल, बी.यू.कुलकर्णी व सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे सचिव संजय जोशी म्हणाले, प्रा.गिरीश पाखरे यांच्या सारख्या अनुभवी प्राध्यापकाची नियुक्ती झाल्याने महाविद्यालयाच्या प्रगतीत भर पडणार आहे, अशा शब्दात त्यांना शुभेच्छा देऊन सत्कार केला.

प्रा.गिरीश पाखरे हे गेल्या २४ वर्षांपासून शैक्षणीक क्षेत्रात कार्यरत असून अकोला येथील मॉडर्न हायस्कूलमध्ये प्राध्यापक म्हणून ११ वर्ष काम केल्यावर नगरच्या सारडा महाविद्यालयात गेल्या १३ वर्षापासून फिजिक्स विषयाचे प्राध्यापक म्हणून ते काम करत आहेत.

तसेच प्रा. गिरीश पाखरे यांनी हिंद सेवा मंडळाचे ते सेवक प्रतिनिधी असून संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या पतपेढीचे चेअरमन म्हणूनही जबाबदारी सांभाळली आहे.

# जिल्हा कारागृहातील बंदी बांधवांसाठी 'राजयोगा मेडिटेशनद्वारे मनशांती' शिबीर

### थंडीपासून संरक्षणासाठी ब्लँकेटचेही वाटप

नगर – येथील रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगरच्यावतीने राजयोगा मेडिटेशनद्वारे मनशांती शिबीर झाले. या शिबीरात राजयोगा मेडिटेशनच्या अभ्यासक डॉ. सुधा कांकरिया यांनी मार्गदर्शन केले तर थंडीपासुन संरक्षणासाठी ब्लँकेट्सचे वाटपही करण्यात आले अशी माहिती कारागृह अधिक्षक संतोष कवार यांनी दिली. सदर प्रसंगी रोटरी पीस कमिटीच्या चेअरमन डॉ. सुधा कांकरिया, सचिव सुभाष गर्जे, अनाम प्रेमचे अध्यक्ष अजित माने, इंजिनियर रोनक माने, तुरूंग अधिकारी चंद्रकांत कदम, सुभेदार हरिषचंद्र उंबासे, हवालदार गणेश बेरड उपस्थित होते.



जिल्हा कारागृहातील बंदी बांधवांसाठी 'राजयोगा मेडिटेशनद्वारे मनशांती' शिबीर घेण्यात आले.

मार्गदर्शनपर भाषणात डॉ. सुधा कांकरिया म्हणाल्या की नवीन वर्षाचा नवीन संकल्प असावा. यंदाच्या वर्षी मनाला शांती मिळण्यासाठी तसेच वाईट विचारापासून संरक्षण होण्यासाठी नियमित मेडिटेशन करावे. मेडिटेशन जीवनपध्दती ही आपल्या भारतीय संस्कृतीने जगाला दिलेली देणगी आहे. त्याचे महत्व आता सर्व जगाला पटले आहे. त्यामुळे संयुक्त राष्ट्राने ही २१ डिसेंबर हा वर्ल्ड मेडिटेशन दिवस म्हणून घोषित केला आहे. मनुष्य शांत मनानेच योग्य तो निर्णय घेऊ शकतो. तसेच जीवनाला योग्य वळण लावू शकतो. मेडिटेशनचे महत्व सांगुन डॉ. सुधा कांकरियांनी मेडिटेशनची विधी समाजाऊन सांगितली. तसेच प्रत्यक्षरूपात सर्वांना मेडिटेशनची अनुभुती करवली.

सुरूवातीस अधिक्षक संतोष कवार यांनी स्वागत करून मेडिटेशन मनाला समृध्द करण्यासाठी तर ब्लँकेट्स शरीराचे थंडीपासुन संरक्षण करण्यासाठी आवश्यक आहेत. दोन्ही बाबींचा आज बंद्यांना लाभ होत आहे असे ते म्हणाले. रोटरीचे सचिव सुभाष गर्जे यांनी आभार मानले.

'मेडिटेशनद्वारे मन:शांती' चे उपक्रम अहिल्यानगर रोटरी पीस बिल्डर क्लबद्वारे अनेक विद्यालय, महाविद्यालय, स्वयंसेवी संस्था, अंध सेवा मंडळ, नामप्रेम, डॉक्टर्स संघटना, हृदयरोगाचे रूग्ण, तसेच कैदी बांधवांसाठी नियमित स्वरूपात घेण्यात येत आहेत. आजपर्यंत हजारो व्यक्तींनी याचा लाभ घेतला आहे, असे ते म्हणाले.

# जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटीच्यावतीने अपघातग्रस्त सभासदास ४ लाखांचा अपघात विम्याचा धनादेश प्रदान

नगर – अहिल्यानगर जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटीने सभासदांचे हित डोळ्यासमोर ठेवून सर्व सभासदांची अपघात विमा पॉलिसी काढलेली असून या पॉलिसीमुळे अपघातात हाताची पाचही बोटे गमावलेल्या पारनेर पंचायत समितीत कार्यरत सभासद प्रदीप भगवान औटी या सभासदाला मोठा आधार मिळाला आहे. त्यांना विमा कंपनीने मंजूर केलेल्या ४ लाख रुपयांच्या मदतीचा धनादेश संस्थेच्या वतीने सभासद औटी यांना प्रदान करण्यात आला आहे.



अहिल्यानगर जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटीचे सभासद प्रदीप औटी यांना अपघात विम्याचा ४ लाखांचा धनादेश प्रदान करताना संस्थेचे चेअरमन कल्याण मुटकुळे, व्हा.चेअरमन श्रीमती मनिषा साळवे, जय श्री गणेश पॅनलचे नेते संजय कडूस, विलास शेळके, अरुण जोर्वेकर यांच्यासह संचालक मंडळ.

प्रदीप औटी यांचा नुकताच अपघात झाला होता. या अपघातात त्यांची हाताची पाचही बोटे निकामी झाली होती. या संदर्भात त्यांना अपघात विम्याचा लाभ मिळावा या साठी संस्थेच्या वतीने विमा कंपनीकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यासाठी संस्थेचे संचालक काशिनाथ नरोडे व प्रशांत निमसे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर विमा कंपनीने ४ लाख रुपयांची मदत मंजूर केली. तशी माहिती संस्थेला कळविण्यात आली. त्यानुसार संस्थेच्या संचालक मंडळाच्या मासिक मिटिंगमध्ये सभासद प्रदीप औटी यांना संस्थेचे चेअरमन कल्याण मुटकुळे, व्हा.चेअरमन श्रीमती मनिषा साळवे यांच्या हस्ते धनादेश प्रदान करण्यात आला. प्रदीप औटी यांना या मदतीमुळे मोठा आधार मिळाल्याने त्यांनी यावेळी संस्थेच्या विषयी कृतज्ञतेची भावना व्यक्त करत संचालक मंडळाला धन्यवाद दिले. ही संस्था खऱ्या अर्थाने सर्वसामान्य सभासदांची सर्वतोपरी काळजी घेणारी कामधेनु आहे अशा शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी संस्थेचे संचालक संजय कडूस, प्रशांत मोरे, विक्रम ससे, विलास शेळके, अरुण जोर्वेकर, भाऊसाहेब चांदणे, इंजि. राजू दिघे, डॉ.दिलीप डांगे, चंद्रकांत संसारे, ऋषिकेश बनकर, स्वप्नील शिंदे, श्रीमती ज्योती पवार, सुधीर खेडकर, श्रीकांत देशमाने, काशिनाथ नरोडे, कैलास डावरे, योगेंद्र पालवे, अर्जुन मंडलिक, श्रीमती सुरेखा महारनूर, प्रशांत निमसे, संभाजी आव्हाड, सभासद अमोल सोनवणे, व्यवस्थापक राजेंद्र पवार, उपव्यवस्थापक प्रशांत लोखंडे उपस्थित होते.

